RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६८ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२९ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राम मंदिराला बसवणार सोन्याचे दरवाजे
## महाराष्ट्रातील लाकूड, तामिळनाडूचे कारागीर देताहेत आकार

### कन्याकुमारीचे कारागीर गेल्या तीन महिन्यांपासून कामात व्यस्त

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

येथील राम मंदिराच्या तळमजल्यावरील काम जवळपास पूर्ण झाले आहे. आता मंदिरात दरवाजे बसवण्याची तयारी सुरू आहे. राम मंदिराच्या तळमजल्यावर लावण्यात येणारे १४ दरवाजे हैदराबादच्या अनुराधा टिंबर्स इंटरनॅशनलचे संचालक सरथ बाबू यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातून आणलेल्या सागवानाच्या लाकडापासून बनवले जात आहेत.

या दरवाजांवर तांब्याची परत लावण्यात आली असून, त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात येणार आहे. कन्याकुमारी येथील कारागीर गेल्या तीन महिन्यांपासून या कामात गुंतले आहेत.

राम मंदिराच्या गर्भगृहाच्या दरवाजाची उंची ८ फूट असून, दरवाजाची रुंदी १२ फूट आहे. दरवाजांवर अंतिम हात फिरविण्यासाठी ते दिल्लीला पाठवण्यात आले आहेत. या दरवाजांवर भव्यतेचे प्रतीक हत्ती, विष्णू कमळ, स्वागताच्या मुद्रेतील देवीच्या प्रतिमा कोरल्या आहेत.



दरवाजे नागर शैलीत डिझाइन केलेले आहेत. यात कमळ, मोर आणि इतर पक्ष्यांचे पारंपरिक भारतीय आकृतिबंध प्रदर्शित केले आहेत. नागर मंदिर स्थापत्यशैली ही उत्तर भारतीय पारंपरिक शैली असून, तिचा उगम इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात गुप्त काळात झाला आणि मुस्लिमांच्या आगमनापर्यंत ती राहिली, असे सांगितले जाते. कंपनीने सांगितले की, आत्तापर्यंत मुख्य मंदिराचे १४ दरवाजे आणि मंदिराभोवतीच्या १०० फ्रेम बनवण्यात आल्या आहेत.

रामजन्मभूमीवर उभारण्यात येणाऱ्या भगवान रामाच्या मंदिराचा २२ जानेवारी रोजी होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा व येत्या शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा असलेला दौरा या पार्श्वभूमीवर अयोध्यानगरीत जागोजागी 'मर्यादा, धर्म आणि संस्कृती' असे लिहिलेले मोठे फलक महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात आले आहेत. मोदी शनिवारी अयोध्या येथील नव्या विमानतळाचे व पुनर्विकास केलेल्या अयोध्या रेल्वे स्थानकाचे उद्घाटन करणार आहेत. विमानतळ ते रेल्वे स्टेशनपर्यंत मोदी यांचा रोड शो होणार आहे. त्यामुळे अयोध्या रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या संख्येने सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहेत. या रेल्वे स्थानकाच्या इमारतीसमोर तसेच स्टेशन रोडवर मोठ्या आकाराचे फलक लावले आहेत.

## राज्यात अवकाळीमुळे १३७९ कोटींचे नुकसान
### शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदतीची अपेक्षा



**दि. २९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नोव्हेंबर अखेरीस झालेला अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे राज्यातील सुमारे १२ लाख ८७ हजार हेक्टरवरील पिकांचे अतोनात नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यासाठी कृषी विभागाने राज्य सरकारकडे १,३७९ कोटी रुपयांची भरपाईची मागणी केली आहे. राज्य आपत्ती निर्मूलन निधीतून ही भरपाई देण्यात येणार असून, याचा लाभ राज्यातील २३ लाख ९० हजार शेतकऱ्यांना होणार आहे. ही मदत लवकरात लवकर मिळावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

**सुमारे २४ लाख शेतकऱ्यांना फटका**

अवकाळी पाऊस व गारपीट झाल्यानंतर तब्बल दीड महिना उलटूनही राज्यातील नुकसानग्रस्त भागातील पिकांचे पंचनामे रखडले होते. कृषी विभागाने तातडीने हा अहवाल पूर्ण करून राज्य सरकारला सादर केला. त्यानुसार राज्यातील १२ लाख ८७ हजार १८५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## मराठा, ओबीसीनंतर आता धनगर समाजही आक्रमक, राज्यातील सर्व नेते पंढरपुरात जमले

### ७५ वर्षात न झालेला निर्णय होणार

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक पंढरपूर**

आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यात मराठा आणि ओबीसी समाज आक्रमक झालाय. २० जानेवारीपासून मनोज जरांगे मराठा कार्यकर्त्यांसोबत मुंबईकडे कूच करणार आहेत. तर त्याच दिवशी ओबीसी समजानेही मुंबईत आंदोलनासाठी परवानगी मागितली आहे. आता यामध्ये धनगर समाजाचीही भर पडली आहे. राज्यातील धनगर समाज आक्रमक झालाय. धनगर आरक्षणासाठी पंढरपुरातील राज्यव्यापी निर्णायक बैठक आज होतेय. मागील ७५ वर्षात न झालेला धक्कादायक निर्णय होणार असल्याचे नेत्यांनी सांगितलेय. आरक्षणासाठी धनगर नेते आक्रमक झाल्येचं पाहायलं मिळालं.

धनगर समाजाला अनुसूचित जमातींमधून आरक्षणासाठी सुरु असलेल्या आंदोलनाची निर्णायक भूमिका ठरविण्यासाठी आज पंढरपूर येथे राज्यव्यापी निर्णायक लढा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीमध्ये ७५ वर्षात न झालेला निर्णय घेतला जाणार असल्याचे धनगर नेत्यांनी सांगितले आहे .



आज यासाठी राज्यभरातील धनगर समाजाचे आजी माजी आमदार , खासदार , नगराध्यक्ष , जिल्हा परिषद , पंचायत समिती सदस्य , नगरसेवक आणि समाजाचे नेते दाखल झाले आहेत.

**धनगर समाज आक्रमक**

अभी नाही तो कभी नाही अशा भूमिकेने आज राज्यभरातील धनगर नेत्यांनी निर्णायक बैठक बोलावली असून या बैठकीत गेल्या ७५ वर्षात झाला नाही असा निर्णय घेतला जाणार असल्याचे एका धनगर नेत्याने सांगितले. एका बाजूला मराठा समाजाचा लढा अंतिम टप्प्यात आला असताना शासन त्यांच्यासाठी काहीही करायच्या तयारीत आहे. मात्र धनगर समाजाचा वापर केवळ सत्तेसाठी आजवर सर्वच पक्षांनी करून घेतल्याचे या नेत्यांनी सांगितले. महाराष्ट्राचा सात बारा हा जणू काही मराठा समाजाच्या नावावर केल्यासारखे सत्ताधारी वागत असल्याच्या संतप्त प्रतिक्रियाही काही धनगर नेत्यांनी दिल्या.

**राजकीय पक्षांना इशारा**

जर धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण सुरु झाल्यास याचा फायदा सर्व ओबीसी समाजाला मिळणार आहे. ओबीसीमध्ये सर्वात मोठा समाज असलेला धनगर यातून बाजूला गेल्यास इतर ओबीसी जातींना याचा लाभ मिळेल, असा दावाही धनगर नेते पांडुरंग मिरगळ यांनी केला. या बैठकीचा फटका २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांना बसेल, असा इशारा यशपाल भिंगे यांनी दिला. आज दुपारी बैठकीनंतर धनगर समाजाची भूमिका जाहीर केली जाणार आहे, असे सांगण्यात आलेय.

## आपल्या हातात फक्त ६० दिवस; निवडणुकांपूर्वी मुख्यमंत्री शिंदेंचे मोठे संकेत

**दि.२९विदर्भ प्रजासताक मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पक्षाचे पदाधिकारी, खासदार, आमदार आणि मंत्र्यांसोबत संवाद साधला. या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीचा आढावा घेण्यात आला. महायुतीत तिसरा पक्ष आल्याने जागा वाटपात घट होणार आहे, त्याचीही या बैठकीत चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी नेत्यांची मते ऐकून घेतली. त्यानंतर या नेत्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. गाफिल न राहण्याचे आणि सर्वांना कामाला लागण्याचे आदेशच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

येत्या मार्च महिन्यापासून आचारसंहिता लागणार आहे. त्यामुळे आपल्या हातात ६० दिवसच उरले आहेत. वेळ कमी असल्याने लोकसभा निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेशच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेते, खासदार, मंत्री आणि आमदारांना दिले. महायुती म्हणून ताकदीने लढा, अशी तंबीही मुख्यमंत्र्यांनी दिल्याचं सूत्रांनी सांगितलं.कुठली जागा गेली, कुठली आली हे डोक्यात ठेवू नका. फक्त महायुती म्हणूनच लढण्याचा विचार करा. आपल्याला ४८ जागा लढून महायुती म्हणून जिंकायच्या आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांनी सर्व हेवेदावे बाजूला सारण्याच्या सूचना देतानाच आपल्याला वातावरण



अनुकूल आहे. त्यामुळे महायुतीचा मोठा विजय झाला पाहिजे, असेही ते म्हणाले.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे येत्या ६ जानेवारीपासून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ६ जानेवारी रोजी मुख्यमंत्री यवतमाळ, वाशिम आणि रामटेकमध्ये मेळाव्याला संबोधित करणार आहेत. तर ८ जानेवारी रोजी अमरावती आणि बुलढाणा, १० जानेवारीला हिंगोली आणि धाराशीव, ११ जानेवारी रोजी परभणी आणि संभाजीनगर, २१ जानेवारी रोजी शिरूर आणि मावळ, २४ जानेवारीला रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, २५ जानेवारीला शिर्डी आणि नाशिक तसेच २९ कोल्हापूर ३० जानेवारी हातकंणगले येथे मुख्यमंत्र्यांचा जाहीर मेळावा होणार आहे. तर पक्षाचे दोन दिवसांचे शिबीर कोल्हापूरला होणार आहे.

शिंदे गटाचे प्रचारमेळावे दोन टप्प्यात पार पडणार आहेत. त्यातील पहिला टप्पा ६ जानेवारी रोजी यवतमाळ येथून सुरू होणार असून ११ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथील सभेने पहिल्या टप्प्यातील प्रचारदौरा पूर्ण होणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात २५ जानेवारीपासून पुन्हा प्रचार मेळाव्याना पुन्हा सुरूवात होणार असून २५ जानेवारी रोजी शिर्डी येथे पहिला प्रचार मेळावा पार पडेल, तर या प्रचार मेळाव्यांचा समारोप ३० जानेवारी रोजी हातकणंगले येथे होईल.

या प्रचार मेळाव्यांचा समारोपासह पक्षाच्या वतीने कोल्हापूर येथे दोन दिवसीय विशेष महाशिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर या शिवसंकल्प अभियानाची सांगता होणार आहे. त्याचप्रमाणे महायुतीतर्फे विभागीय प्रचार मेळावे होणार असून त्याच्या तारखाही लवकरच निश्चित करण्यात येतील असेही यावेळी शिंदे यांनी सांगितले.

## कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू पदाचा पदभार स्वीकारला

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू पद स्व.डॉ. दिलीप मालखेडे यांचे निधनानंतर रिक्त झाले होते, त्या पदाचा पदभार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी स्वीकारला होता. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री रमेश बैस यांनी कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांचेकडे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदभार सोपविला. त्यांनी आज प्रभारी कुलगुरू पदाचा प्रभार कुलगुरू डॉ.




प्रमोद येवले यांचेकडून स्वीकारला.

कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी संत गाडगे बाबा यांच्या संदेशशिल्पाला पुष्पार्पण करुन अभिवादन केले. प्रास्ताविक व नवनियुक्त कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांचा परिचय कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी करुन दिला. कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी व माजी प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी सत्कार केला.

कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी लगेचच सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय अधिकार्यांशी वार्तालाभ केला. सभेमध्ये सर्व विभागांना असलेल्या अडचणी त्यांनी जाणून घेवून सभेत अनेक महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा केली.

पदभार ग्रहण समारंभाला प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. तनुजा राऊत, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक सौ. मोनाली तोटे पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे, अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, डॉ.डी.डब्ल्यू. निचित, उपकुलसचिव (आस्था) श्री मंगेश वरखेडे, डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम, डॉ. धनंजय गुजराती तसेच विद्यापीठातील अधिष्ठाता, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अयोध्येतील सोहळ्यामुळे अर्थव्यवस्थेला गती; देशात ५० हजार कोटींची उलाढाल

### श्री राम मंदिराच्या उद्घाटनदिवशी देशभरात ५०,००० कोटी रुपयांपेक्षा मोठी उलाढाल होण्याचा अंदाज

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या २०**

अयोध्येत प्रभू श्रीरामांचे भव्य-दिव्य मंदिर उभारलं जात असून २२ जानेवारी रोजी येथे प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. अयोध्येत या सोहळ्याची जोरदार तयारी सुरू असून मोठ्या संख्येने रामभक्त अयोध्येत दाखल होत आहेत. देशभरातून या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने भाविक भक्त अयोध्या नगरीत येणार असून देशभरातील अनेक शहरांमध्ये या सोहळ्याचा उत्सव साजरा होत आहे. त्यामुळेच, या सोहळ्यातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणार असल्याचा अंदाज बांधला जात आहे.

श्री राम मंदिराच्या उद्घाटनदिवशी देशभरात ५०,००० कोटी रुपयांपेक्षा मोठी उलाढाल होण्याचा अंदाज आहे. व्यापारी संघटना असलेल्या कनफेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या (उ-खढ) अंदाजानुसार २२ जानेवारी रोजी देशभरात ५० हजार कोटी रुपयांचा व्यापार होण्याची शक्यता आहे. त्यासाठी, व्यापार्यांनीही कंबर कसली असून गरजेनुसार वस्तू आणि सामानांची खरेदी-विक्री सुरू केली आहे.

कॅटचे राष्ट्रीय नेते प्रवीण



खंडेलवाल यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, विश्व हिंदू परिषदेच्या आव्हानानुसार देशभरात १ जानेवारीपासून राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अभियान चालवण्यात येणार आहे. त्यासाठी, देशभरातील लोकांमध्ये उत्साह दिसून येत आहे. त्यामुळेच, उद्योग, व्यापार क्षेत्रातही मोठी संधी असल्याचं बोललं जात आहे. अंदाजे, २२ जानेवारी रोजी देशभरात ५० हजार कोटी रुपयांची अतिरीक्त उलाढाल होऊ शकते.

प्रभू श्रीराम यांच्याशी संलग्नित वस्तूंची मोठी मागणी असून श्रीराम यांची मूर्ती, प्रतिमा, श्री रामध्वज, अंगवस्त्र, रामचित्रांच्या माळा, लॉकेट, राम मंदिराची प्रतिकृती यांसह अनेक बारीक-सारीक वस्तूंना मोठी मागणी आहे. मंदिर प्रतिकृती हार्डबोर्ड, प्लायवूड किंवा लाकडापासून बनविण्यात येत आहे. त्यामुळे, त्यांनाही मोठी मागणी आहे. यातून, स्थानिक महिला व कारागिरांना मोठा रोजगार मिळाला आहे. श्रीराम यांच्या नावाने कुर्ता, टी-शर्ट आणि इतरही पोशाख बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहे. २२ जानेवारी रोजी देशभरात दिवाळी साजरी करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. त्यामुळे, मातीच्य दिव्यांनाही मोठी मागणी आली आहे.

## संपादकीय ......

# प्रजाजनीं जें रचिलें स्वप्नीं

देशात सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. दुसर्या शब्दांत सांगायचे झाले, तर 'राममय' वातावरण आहे. उत्तर प्रदेशातील अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि देशभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत नव्या वर्षात २२ जानेवारीला होत आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. १५२८ ते २०२० अशी तब्बल ४९२ वर्षे राम मंदिराच्या स्वप्नपूर्तीचा लढा चालला. १५२८ मध्ये या जागी बाबरी मशीद उभारली गेली, तर ५ ऑगस्ट २०२० रोजी राम मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले. यादरम्यान न्यायालयीन संघर्ष सुरू होता. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने राम मंदिराच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर या संघर्षाला पूर्णविराम मिळाला. नव्या वर्षात राम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. हा ऐतिहासिक सोहळा 'याची देही, याची डोळा' पाहण्यासाठी देशभरातून लाखो भाविक अयोध्येत दाखल होत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशातील २५ कोटी कुटुंबांना अक्षतेच्या स्वरुपात या सोहळ्याचे निमंत्रण देण्याची तयारी सुरू केली असून येत्या १ ते १५ जानेवारी दरम्यान हे अभियान चालवण्यात येणार आहे. त्यासाठीच रेल्वे प्रशासनाने देशातील ५० प्रमुख शहरांतून जवळपास १५०० अयोध्या स्पेशल ट्रेन चालविण्याची तयारी केली आहे. त्याशिवाय, विमानसेवाही सज्ज आहे. दिल्लीप्रमाणेच मुंबईहून अयोध्येला जाण्यासाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची घोषणा इंडिगोने केलेली आहेच.असे हे राम मंदिराचे स्वप्न साकारले जाणार असले तरी, त्याला अजूनही संघर्षाची झालर आहेच. आता संघर्षाची झालर म्हणण्यापेक्षा त्याला राजकारणाची झालर म्हणणे उचित ठरेल. या सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेवरून रुसवेफुगवे सुरू आहेत. 'मंदिर वहीं बनायेंगे'ची घोषणा देत ज्यांनी राम जन्मभूमीसाठी १९९० मध्ये रथयात्रा काढून देशातील राजकीय वातावरण ढवळून काढले, ते भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना या सोहळ्याला बोलावण्यावरून वादंग निर्माण झाला होता. वय आणि प्रकृती लक्षात घेता, लालकृष्ण अडवाणी यांच्यासह भाजपचे ज्येष्ठ नेते मुरली मनोहर जोशी या दोन्ही नेत्यांनी सोहळ्यास उपस्थित राहू नये, अशी विनंती राम मंदिर ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी केली होती, मात्र त्यावरून तीव्र प्रतिक्रिया उमटताच लगेचच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषदेच्या नेत्यांनी दोन्ही नेत्यांना आग्रहाचे निमंत्रण दिले. या वादाची धूळ खाली बसते न बसते तोच आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना निमंत्रण न दिल्यावरून भाजपला टीकेचे लक्ष्य केले जात आहे.प्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांनी म्हटल्याप्रमाणे, 'माझाच आदर्श ठेवा' हे सांगण्याची हिंमत स्वातंत्र्य मिळाल्यापासून एकाही नेत्याजवळ नाही, यात सगळं आलं. 'एवढेच म्हणता येईल की, आतापर्यंतच्या संघर्षाच्या पायावर २२ जानेवारी २०२४ मध्ये कळस रचला जात आहे आणि या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार आपण तमाम भारतीय आहोत. या जल्लोषात भले आपण प्रत्यक्ष सहभागी होऊ शकत नसू तरी, टाळ्या वाजवून त्या आनंदात सहभागी होण्यास काय हरकत आहे? आता प्रश्न राहिला तो यावरून सुरू असलेल्या राजकारणाचा; नाताळ सुरू आहेच, त्यामुळे राजकारण्यांबाबतीत प्रभू येशू ख्रिस्ताची आठवण ठेवून एवढेच म्हणू शकतो, 'हे प्रभू श्रीरामा यांना तू माफ कर, त्यांना हे माहीत नाही की ते काय करत आहेत.'

# विदर्भ साहित्य संघाचे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार जाहीर

## १४ जानेवारीला होईल समारोह

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** – विदर्भ साहित्य संघाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या वायय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. येत्या १४ जानेवारी २०२४ रोजी विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त साहित्यिकांना हे वायय पुरस्कार प्रदान करण्यात येतील.यंदा राज्यस्तरीय विदर्भ साहित्य संघ अनुवाद पुरस्कार स्मिता लिमये यांच्या 'चर्नोबिलची प्रार्थना' या पुस्तकाला प्राप्त झाला आहे. राज्यस्तरीय आशा सावदेकर स्मृती साहित्य समीक्षा पुरस्कार 'राजारामशास्त्री भागवत यांचा भाषाविचार' या मनीषा खैरे यांच्या ग्रंथाला बहाल करण्यात येणार आहे तर राज्यस्तरीय कविवर्य श्रीधर शनवारे स्मृती पुरस्कार 'शतकोत्तरी ओरखडा'या राजीव जोशी यांच्या ग्रंथाला प्राप्त झाला आहे. ज्येष्ठ साहित्यिक पु. य. देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार नरेंद्र शेलार यांच्या 'महाकारुणिक' कादंबरीला, अण्णासाहेब खापर्डे स्मृती आत्मकथन पुरस्कार 'मी पॉझिटीव्ह आलो' या प्रमोद नारायणे यांच्या



पल्लवी पंडित, प्रमोद नारायणे, संजय वासुदेव कठाळे, स्मिता लिमये, प्रमोद वडनेरकर, राजीव जोशी, प्रफुल्ल सावरकर, केतन पळसकर

आत्मकथनाला, कुसुमानिल स्मृती समीक्षा पुरस्कार डॉ. मिलिंद चोपकर यांच्या 'मराठी वनसाहित्य : आस्वादाची अक्षरे' या ग्रंथाला तर शरच्चंद्र मुक्तिबोध स्मृती कविता लेखन पुरस्कार बबन सराडकर यांच्या 'आवर सावर' या कवितासंग्रहला प्राप्त झाला आहे. वा. कृ. चोरघडे स्मृती कथा लेखन पुरस्कार डॉ. रमा गोळवलकर यांच्या 'खुर्जरवाहिका' ला तर य. खु. देशपांडे स्मृती शास्त्रीय लेखन पुरस्कार मिलिंद कीर्ती यांच्या 'तंत्रज्ञानाची प्रबळ सत्ता – कृत्रिम बुद्धीमत्तेचे मायाजाल युग' ला प्राप्त झाला आहे. संत गाडगेबाबा स्मृती प्रवासवर्णन लेखन पुरस्कार 'अगं नर्मदे' या संजय वासुदेव कठाळे यांच्या ग्रंथाला, वा. ना. देशपांडे स्मृती ललित लेखन पुरस्कार प्रफुल्ल उदयन सावरकर यांच्या 'निसर्ग संवाद–अनुभव जंगलातले' या ग्रंथाला देण्यात येणार आहे. मा. गो. देशमुख स्मृती संत साहित्य लेखन पुरस्कार डॉ. गिरीश सपाटे यांच्या 'भागवत धर्मातील अलक्षित संत कवी' व डॉ. माया पराते–रंभाळे यांच्या 'संत कवयित्रींची भावकविता' यांना विभागून देण्यात येणार आहे. नाना जोग स्मृती नाट्यलेखन पुरस्कार प्रमोद भुसारी यांच्या 'भोवरा' व आनंद भीमटे यांच्या 'गद्दार' या नाट्यकृतींना विभागून देण्यात आला आहे. बा. रा. मोडक स्मृती बालसाहित्य लेखन पुरस्कार शंकर क–हाडे यांच्या 'अब्राहम लिंकन' या साहित्यकृतीला, डॉ. वा. वि. मिराशी स्मृती वैचारिक वाडमय पुरस्कार 'महासत्तेच्या स्पर्धेत चीन' या प्रमोद वडनेरकर यांच्या ग्रंथाला तर के.ज. पुरोहित पुरस्कृत 'शांताराम' कथा पुरस्कार 'बकुळ डंख (अक्षरलिपी दिवाळी अंक २०२३)' या डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांच्या कथेला, कविवर्य ग्रेस 'युगवाणी'तील सर्वोत्कृष्ट लेखनासाठीचा पुरस्कार दिनकर बेडेकर यांच्या 'जी. एं. च्या कथेतील रंगभान आणि दृष्टभान' या लेखाला प्राप्त झाला आहे. वैभव भिवरकर यांच्या 'करुणेचे कॉपीराईट्स' व पल्लवी पंडित यांच्या 'सफरनामा – निवडक कलाकारांचा' या साहित्याकृतींना नवोदित लेखनाचा पुरस्कार देण्यात येणार आहे. स्व. हरिकिशन अग्रवाल स्मृती पुरकार सकाळ दैनिकाचे पत्रकार केतन पळस्कर यांना प्रदान केला जाणार आहे.

# नवीन वर्षात आहेत मोठे लॉंग विकेंड

## आताच करा सुट्यांचे नियोजन

**दि. २९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** : नवीन वर्षात काय करायचं? हे आपण नेहमीच अगोदर ठरवण्याचा प्रयत्न करत असतो. खासकरुन सुट्टी कधी असणार? आपल्याला ट्रीपसाठी कधी जाता येईल? हे जाणून घेण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात. २०२३ मध्ये अनेक उत्सव शनिवारी किंवा रविवारी आले होते. त्यामुळे अनेकांना सुट्यांचा आनंद घेता आला नाही. मात्र, २०२४ सुट्याच सुट्या आल्या आहेत. शिवाय, ३–४ सुट्या अनेकदा एकदम आल्या आहेत. सुट्यांचे दिवस कसे असतील जाणून घेऊयात...

### तामिळनाडूमध्ये १५ जानेवारीला पोंगल साजरा होणार

पोंगल हा सण तामिळनाडू , आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि केरळमध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. तामिळनाडूमध्ये या सणाचे महत्व सर्वात जास्त आहे. तुम्ही दक्षिण भारतात राहत असाल तर तुम्हाला पोंगलसाठी सुट्टी नक्कीच मिळेल. जर तुम्हाला पोंगलसाठी सुट्टी मिळाली तर तुम्ही लॉंग विकेंडवर जाऊ शकता. १५ जानेवारी म्हणजेच सोमवारी पोंगल साजरा करण्यात येणार आहे.

### मकर सक्रांतीमुळे मिळणार लागोपाठ ३ सुट्या

महाराष्ट्र आणि इतर राज्यात देखील मकर सक्रांत मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येते. दरवर्षी मकर सक्रांत १४ जानेवारीला साजरी केली जाते. मात्र, यावर्षी मकर सक्रांत १५ जानेवारीला साजरी करण्यात येणार आहे. यावर्षी हा सण सोमवारी आला आहे. त्यामुळे लागोपाठ ३ सुट्या मिळू शकतात. तुम्हाला मित्रांसमवेत अथवा कुटुंबियांसोबत ट्रीपसाठी जायचे असेल तर तुम्ही योजना आखू शकता. १४ जानेवारीला रविवार असणार आहे. तर १३ जानेवारीला शनिवार आला आहे. तुम्ही या सुट्यांचा आनंद घेऊ शकता.

### ८ मार्चला महाशिवरात्र

महाशिवरात्र यंदाच्या वर्षी ८ मार्चला असणार आहे. शुक्रवारी महाशिवरात्र असेल. महाशिवरात्रीमुळेही तुम्हाला आराम करता येईल. शिवाय, विकेंडचा आनंद घेण्यासाठी तुम्ही बाहेरही पडू शकता. शिवाय, तुम्ही महशिवरात्रीच्या निमित्ताने दर्शनाच्या निमित्तीने महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांना भेटी देऊ शकता.

### 'गुड फ्रायडे'मुळे मिळू शकतो लॉंड विकेंड

नवीन वर्षात गुड फ्रायदे २९ मार्चला असणार आहे. शिवाय ३१ मार्चलाही सुट्टी मिळणार आहे. त्यामुळे तुम्ही या दिवसांमध्ये मित्रांसोबत ट्रीपला जाण्याचा प्लॅन करु शकता. ३ दिवसांची सुट्टी मिळाल्याने ट्रीपला भरपूर वेळ मिळणार आहे.

### दिवाळीचे सेलिब्रेशन

नव्या वर्षातील दिवाळी १ नोव्हेंबरला रोजी असणार आहे. यानंतर एक दिवस सोडून रविवार आला आहे. ३ नोव्हेंबरला भाऊबीज आहे. या काळात तुम्ही तुमच्या कुटुंबीयांसोबत दिवाळीचे जोरादार सेलिब्रेशन करु शकतात. शिवाय, दिवाळीत येणाऱ्या विकेंडमध्ये तुम्ही आरामही करु शकता.




### गुरुनानक जयंती

दिवाळीनंतर काही दिवासांनी गुरुनानक जयंती आहे. १५ नोव्हेंबरला गुरुनानक जयंती असणार आहे. यादिवशी शुक्रवार आहे. तर लगेच १७ नोव्हेंबरला रविवार आहे. त्यामुळे एक दिवस सोडून सुट्या मिळणार आहेत.

### नवीन वर्षातील ख्रिसमस

२०२४ च्या शेवटी २५ डिसेंबरला ख्रिसमसची सुट्टी मिळणार आहे. २१ डिसेंबरला शनिवार आहे. तर २२ डिसेंबरला रविवार आला आहे. यानंतर २३ डिसेंबरला म्हणजे मंगळवारी सुट्टी आहे. तुम्हाला ख्रिसमसमुळे ५ दिवसांचा मोठा विकेंड मिळू शकतो. शिवाय, वर्षाचा शेवट तुम्ही वेळ काढून साजरा करु शकतो.




## नवीन वर्षापासून 'या' ५ सवयी फॉलो करा; अनेक आजारांपासून होईल सुटका

**दि. २९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – येत्या काही दिवसांत २०२४ सुरू होणार आहे. नवीन वर्ष प्रत्येकासाठी आशेचा किरण घेऊन येतं. नवीन वर्षाच्या आधी, लोक आपल्या जीवनात बदल करण्यासाठी अनेक संकल्प करतात. अशा परिस्थितीत आज आम्ही तुम्हाला अशा काही सवयींबद्दल सांगणार आहोत ज्या तुम्हाला नवीन वर्षात निरोगी राहण्यास मदत करतील.



येत्या वर्षभरात तुम्हालाही निरोगी राहण्यासाठी तुमच्या काही सवयी बदलायच्या असतील, तर चला जाणून घेऊयात कोणत्या सवयी बदलून तुम्ही निरोगी राहू शकता.

**वेळेवर झोप घ्या**

आजकाल लोकांच्या झोपण्याच्या आणि खाण्याच्या वेळा पूर्णपणे बदलल्या आहेत. ते रात्री उशिरा झोपतात आणि जेवण उशिरा करतात. अशा स्थितीत हे देखील आजारांचे एक मोठे कारण ठरू शकते. त्यामुळे सर्वात आधी सर्व कामे करण्याची सवय लावा. वेळेवर झोपा तसेच ८ तासांची झोप घ्या.

**तणाव मॅनेजमेंट करा**

आजच्या काळात, प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या कारणाने तणावात आहे. पण, काही लोक त्या समस्येबद्दल खूप काळजी करतात. त्यामुळे त्यांना मानसिक आरोग्याच्या समस्या असू शकतात. म्हणून, तुमचा तणाव व्यवस्थापित करण्यासाठी, तुम्ही ध्यान आणि माइंडफुलनेस यासारख्या तणाव व्यवस्थापन तंत्रांचा अवलंब केला पाहिजे.

**व्यायाम करा**

शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी शरीर सक्रिय ठेवणं अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी रोज व्यायाम करण्याची सवय लावावी. यासाठी तुम्ही मॉर्निंग वॉक, व्यायाम, योग किंवा डान्स क्लास यांसारखे उपक्रम करू शकता.

**योग्य खाण्याच्या सवयी लावा**

आजकाल लहान मुले असो वा तरुण, जंक फूड आणि पॅक्ड केलेले पदार्थ खायला सर्वांनाच आवडतात. पण, ते तुमच्या आरोग्यासाठीही हानिकारक ठरू शकते. त्यामुळे या वर्षापासून घरचे बनवलेले पदार्थ आणि सकस अन्न खाण्याची सवय लावा.

**वाचन करा**

तुम्ही दिवसाला कितीही व्यस्त असाल पण वाचनासाठी किमान दिवसातून थोडा वेळ काढून पुस्तके वाचली पाहिजेत. यातून आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. याबरोबरच तुमचे विचार आणि तुमचा पुढच्या वर्षीच प्लॅन, अनेक योजना यांचे वेळापत्रक डायरीत लिहावे. यामुळे तुम्हाला खूप आराम मिळू शकतो.

# अवैध पार्ट्या, बनावट मद्य उत्पादन शुल्काच्या रडारवर

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** ९३१ डिसेंबर व नववर्षाच्या स्वागतासाठी शासनाने मद्य विक्री परवाने रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी दिली आहे. मात्र, यानिमित्त अवैध दारू निर्मिती, विक्री, वाहतूक व साठवणूक होऊ नये, याकरिता तसेच राज्यात विक्रीस बंदी असलेल्या त्याचप्रमाणे बनावट मद्याची तस्करी रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने कंबर कसली आहे. त्याकरिता तीन गस्ती पथकाची निर्मिती करण्यात आली असून त्याव्दारे रात्रीची गस्त, नाकाबंदी करून वाहन तपासणी, संशयित धाब्याची तपासणी केली जात असल्याची माहिती अधीक्षक ज्ञानेश्वरी आहेर यांनी दिली.सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी ठिकठिकाणी मोठ्या पार्ट्यांचे आयोजन केले जाते. त्यादृष्टीने उत्पादन



शुल्क विभागाचा एक दिवसीय परवाना न घेता अवैध पार्ट्या नियोजित करण्याची शक्यता लक्षात घेता अशा पार्ट्यांवर विशेष लक्ष ठेवून कारवाई करण्यात येणार आहे. बार आणि परमीट रूमचा परवाना नसलेल्या हॉटेल व धाब्यावर अवैधरीत्या मद्यविक्री आढळून आल्यास महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४५ अंतर्गत ६८ व ८४ कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे

# राज्यातील आशा वर्कर व गटप्रवर्तक १२ जानेवारीपासून पुन्हा संपावर

## जीआर न काढल्याचा विरोध : आजपासून ऑनलाईन डाटा एन्ट्री बंद करणार

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** ५: राज्य सरकारतर्फे मागण्यांबाबत कोणताही निर्णय न झाल्याने आशा सेविका व गटप्रवर्तक कर्मचाऱ्यांनी २९ डिसेंबरपासून ऑनलाईन डाटा एन्ट्री बंद करण्याची घोषणा केली आहे. यापुढे सरकारने ११ जानेवारी २०२४ पर्यंत जीआर काढला नाही तर १२ जानेवारीपासून पुन्हा संपावर जाण्याचा इशारा कर्मचारी संघटनेने दिला.

आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयू) तर्फे गुरुवारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. डवले यांना आशा वर्कर यांच्या विविध प्रश्नांना घेऊन निवेदन सादर करत चर्चा करण्यात आली. प्रत्येक यू पी एच सी मधील सर्व आशा वर्कर यांना आरोग्य वर्धीनीचा लाभ सरसकट देण्यात यावा, आशा ही स्वयंसेविका असल्याने संप काळातील केलेल्या कामाच्या दिलेल्या माहितीनुसार सरसकट मानधन करण्यात यावे, हत्तीरोग निर्मूलन अभियानाच्या थकीत निधी आशा वर्कर यांना त्वरित देण्यात यावा, आशा वर्कर यांना ऑनलाइन कामाची सक्ती न करता डाटा ऑपरेटरकडे काम सोपवण्यात यावे. तसेच ज्या आशा वर्कर ऑनलाईन डाटा एन्ट्री काम करत असतील त्यांना विशेष मोबदला देण्यात यावा, आशा वर्कर यांना ऑनलाइन डाटा एन्ट्री करता धमकावणाऱ्या वरिष्ठ कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा आदी मागण्या संघटनेतर्फे करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद मुख्यालय येथे मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील आशा वर्कर व गटप्रवर्तक उपस्थित होत्या. यावेळी अध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे, महासचिव प्रीती मेश्राम, सरला मस्के, सारिका लांजेवार, मोनिका गेडाम, रेखा पानतावणे, सरिता ठवरे, रंजना



पौनीकर, लक्ष्मी कोत्तेजवार, कांचन बोरकर, आरती चांभारे, मंगला बागडे, रेशमा सातपुते, भाग्यश्री गायके, प्रतिमा डोंगरे आदींचा सहभाग होता.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# पौष्टिक तृणधान्याचे महत्व व फायद्यांविषयी जनजागृतीसाठी

# भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन

## विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय व जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दाखविली हिरवी झेंडी





**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती=** यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य म्हणून साजरे केले जात आहे. पौष्टिक तृणधान्याचे आहारमधील महत्व व फायदे याबाबत लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कृषी विभागाव्दारे भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त तयार करण्यात आलेल्या चित्ररथाला व रॅलीला विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय व जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला.

कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त तसेच आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी पंचवटी चौक येथील डॉ. पंजाबराव देखमुख यांच्या पुतळ्याला विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याव्दारे पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रॅलीला मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गक्रमण करण्यात आले. पंचवटी चौक येथून रॅलीचा शुभारंभ होऊन शहरातील महत्वाच्या रस्ते मार्गाने मार्गस्थ होऊन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनीच्या ठिकाणी समारोप झाला.

कृषी सहसंचालक किसन मुळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहूल सातपुते, आत्माच्या संचालिका अर्चना निस्ताने यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी या रॅलीत प्रत्यक्ष उपस्थित राहून सहभागी झाले होते.

मानवी आहारात वापरल्या जाणाऱ्या तृणधान्य पिकामध्ये भात व गहू या प्रमुख धान्याचा समावेश होतो. इतर भरडधान्य पिकांमध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, कोदो, कुटकी, बरटी व वरई या पिकांचा समावेश होतो. राज्यात ज्वारी, बाजरी, नाचणी आणि वरई या पिकांची लागवड केली जाते. साधारणपणे २० व्या शतकाच्या पूर्वार्धात पारंपरिकदृष्ट्या या पिकांची लागवड आणि उत्पादन आपल्या देशात घेतले जात होते. आपल्या दैनंदिन आहार पद्धतीत या धान्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. कालांतराने भात आणि गहू या पिकांचे अधिक उत्पादन आणि उपलब्धता वाढल्याने व आहार पद्धतीत झालेल्या बदलामुळे आजच्या काळात या भरडधान्य पिकांखालील क्षेत्र कमी होत आहे. पौष्टिक तृणधान्याचे महत्व व त्याचे आहारातील फायदे याबाबत लोकांमध्ये व्यापक जनजागृती होण्यासाठी यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्यानुसार कृषी विभागाव्दारे रॅली, विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे, असे श्री. मुळे यांनी यावेळी सांगितले.

# चेकिंग चालू है, कोरोना आलाय..

# म्हणत १५ हजार रुपये लांबविले



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** मास्क नही लगाया, यहाॅ चेकिंग चालू है, बडा अधिकारी हू, मुझे आपकी तलाशी लेनी होगी, अशी बतावणी करून एका ६८ वर्षीय वृध्दाला १५ हजार रुपयांनी लुटण्यात आले. २७ डिसेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास पंचवटीस्थित पीडीएमसी रूग्णालयासमोर ही घटना घडली. याप्रकरणी, गाडगेनगर पोलिसांनी श्रावण बाळकराम मोरले (६८, रा. मासोद, ता.मुलताई, जि. बैतूल) यांच्या तक्रारीवरून अज्ञात इसमा विरूध्द फसवणुकी चा गुन्हा दाखल केला. मोरले हे त्यांच्या मित्राला भेटण्याकरीता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय 'पीडीएमसी' त जात असताना एका अज्ञात इसमाने त्यांना रूग्णालयासमोरच अडविले. तथा तुम्ही मास्क लावलेला नाही. कोरोना परत येत आहे, आम्ही त्यासाठीच तपासणी सुरू केली आहे. मोठे अधिकारी देखील तपासणी करत आहेत. मला देखील तुमची तपासणी करावी लागेल, अशी बतावणी केली. त्या अज्ञात आरोपीने मोरले यांच्या कपड्यांची झडती घेतली. तथा हातचलाखी करून मोरले यांच्या बनियानच्या खिशामधून १५ हजार रुपये रोख काढून घेतली. क्षणातच तो तेथून रफुचक्कर झाला. दरम्यान, खिशातील पैसे त्या अज्ञात भामटयाने लांबविल्याचे लक्षात येताच मोरले यांनी गाडगेनगर पोलीस ठाणे गाठले. याप्रकरणी, रात्री ८.१७ च्या सुमारास अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# नववर्षाच्या स्वागतासाठी पहाटेपर्यंत सुरू राहणार मद्यालये

## आयोजनासाठी ग्रामीण भागात ३,३०० रुपये, शहरात ११ हजार आणि व्यावसायिक पार्ट्यांसाठी २२ हजार रुपये शुल्क

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** नववर्षाच्या स्वागतासाठी मद्यालये ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीनंतरही सुरू ठेवण्याचा निर्णय राज्य उत्पादन शुल्क विभागाने जाहीर केला आहे. त्यानुसार बिअरबार आणि क्लब पहाटे पाचपर्यंत सुरू राहणार आहेत. सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी नागपूर जिल्ह्यात सर्वत्र थर्टी फस्टचे आयोजन करण्यात येते. उत्साहात साजरा होणाऱ्या आयोजनात कुठल्याही अडचणी येऊ नये म्हणून विभागाने निर्णय घेतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### मद्य खरेदीचा परवाना असलेल्यांनाच मद्याची विक्री

मद्य खरेदीचा परवाना असलेल्यांना मद्याची विक्री करण्याची विभागाची परवानगी आहे. एका दिवससाठी ५ रुपयांचा तात्पुरता परवाना विक्रेते देतात. असे असतानाही मद्य विक्रेते नियम डावलून मद्याची विक्री करीत असल्याचे बहुतांश दुकानांमध्ये दिसून येते. त्यावर अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने नागपूर जिल्ह्यात हा प्रकार सर्रास सुरू असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. लहान मुलांना मद्यविक्री करू नका, अशी नागरिकांची मागणी आहे. शिवाय थर्टी फस्टची पार्टी वा जल्लोषात लहान मुलांचा समावेश करू नका, असे निर्देश विभागाने दिले आहेत.

### नियमाच्या उल्लंघन केल्यास होऊ शकतो दंड

नववर्षाच्या स्वागतासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने नियमात शिथिलता दिली आहे. पण नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर अधिकाऱ्यांची करडी नजर राहणार आहे. प्रसंगी दंडही आकारण्यात येणार आहे. कायद्याचे उल्लंघन करून नियमांचे आयोजन करण्यात येत असेल तर आयोजकाला ३ ते ५ वर्षांपर्यंत शिक्षा आणि २५ ते ५० हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. त्यामुळे कायद्याचे पालन करण्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे. नियंत्रण ठेवण्यासाठी विभागाचे दोन भरारी पथके आणि सहा कार्यकारी पथके कार्यरत राहणार आहेत.



### मद्य परत करता येणार

पार्टीत मद्य किती लागणार, याची नोंद आयोजकाला उत्पादन शुल्क विभागाकडे करावी लागणार आहे. तात्पुरता परवाना केवळ पार्टीपुरताच राहणार आहे. पार्टी संपल्यानंतर २४ तासांच्या आत उरलेले मद्य उत्पादन शुल्क विभागाकडे परत करावे लागते. उरलेल्या मद्याचा वापर अन्य ठिकाणी केल्यास परवाना घेतलेल्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमासाठी मनपाची परवानगी आवश्यक आहे. मात्र, कार्यक्रमात मद्याचा वापर होत असेल तर उत्पादन शुल्क विभागाची परवानगी बंधनकारक आहे. ग्रामीण भागात ३,३०० रुपये, शहरात ११ हजार आणि व्यावसायिक पार्ट्यांसाठी २२ हजार रुपये शुल्क विभागाकडे भरावे लागेल.

### नागरिकांना करता येणार तक्रार

नागरिकांना विभागाच्या मुंबई येथील आयुक्त कार्यालयाच्या सुविधा केंद्रात तक्रार करता येणार आहे. तक्रारकर्त्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येणार आहे. कारवाई पथकाला कुठे कारवाई करायची, याची माहिती दिली जाईल. कायद्याचे पालन करून नववर्षाचे स्वागत करण्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे. विभागाने टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९, व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ असा आहे.

**– अशी असेल वेळ:**

- वाईन शॉप (एफएल-२) : सकाळी १० ते मध्यरात्री १ पर्यंत.
- बिअर शॉपी : सकाळी १० ते मध्यरात्री १ पर्यंत.
- बिअरबार : सकाळी ११ ते पहाटे ५ पर्यंत.
- क्लब : सकाळी ११ ते पहाट ५ पर्यंत.

# ट्रॅक्टर ट्रॉली चोरणारी परजिल्ह्यातील टोळी जेरबंद

## पाच लाखांचा ट्रॅक्टर ४० हजारात विकल्याची घटना



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** चांदूररेल्वे तालुक्यातील बासलापूर येथून ट्रॅक्टर ट्रॉली चोरून नेणाऱ्या चौघांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. आरोपींकडून चोरलेली ट्रॅक्टर ट्रॉली जप्त करण्यात आली. आरोपींनी ती ट्रॅक्टर ट्रॉली अवघ्या ४० हजार रुपयांत विकली होती. हे विशेष. अटक आरोपींमध्ये किशोर रामभाउ सदावर्ते (३९, रा.

### स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासाला यश

आरेगाव ता. मेहकर जि. बुलढाणा),अरुण बाबुराव पोहार (३५, रा. जालना), सचिन बजरंग ढोंगळे (३२, रा. झाकली ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर) व मल्हार उर्फ जेसीबी. गंगाराम वाणी (३७, रा. हाता ता. सेनगाव जि. हिंगोली) यांचा समावेश आहे.

### आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

अटक आरोपींकडून अधिक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता एलसीबीने व्यक्त केली आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी प्रमुख किरण वानखडे, यांच्या नेतृत्वात उपनिरिक्षक मोहम्मद तस्लीम व मुलचंद भांबुरकर, अंमलदार पुरुषोत्तम यादव, मंगेश लकडे, चंद्रशेखर खंडारे, सचिन मसांगे, मंगेश मानमोठे यांनी ही कारवाई केली.

१७ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास बासलापूर येथील गजानन बोबडे यांच्या मालकीची ट्रॅक्टर ट्रॉली चोरीला गेली होती. चांदूररेल्वे पोलिसांनी १९ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल केला होता. स्थानिक गुन्हे शाखा त्या गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना ती ट्रॅक्टर ट्रॉली बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील मुख्य आरोपी गजानन मुळे याने साथीदारासह चोरी केल्याचे समजले.

### कारने पोहोचले बासलापूरात

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजानन मुळे याला ताब्यात घेवून विचारपुस केली असता आपण किशोर सदावर्ते, सचिन ढोंगळे व अन्य तिघांच्या सहाय्याने ती ट्रॅक्टर ट्रॉली चोरल्याची कबुली दिली. आपण किशोर सदावर्ते याच्या कारने बासलापुरात गेलो. ट्रॅक्टर ट्रॉली चोरी करून ती मल्हार उर्फ जेसीबी गंगाराम वाणी याच्या माध्यमातून जालण्याच्या अरूण पोहार याला ४० हजार रुपयांत विकल्याचे कबुल केले. त्याआधारे वरून मल्हार उर्फ जेसीबी व अरूण पोहार यांना अटक करून त्यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉली व चारचाकी जप्त करण्यात आली. अन्य चार फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

# अमरावती येथे राष्ट्रीय कृषि प्रदर्शनात ५१ लाखांचा 'सुलतान' आकर्षण

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त २७ डिसेंबरपासून राष्ट्रीय कृषी प्रदर्शन येथील श्री. शिवाजी कृषी महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे. ही कृषी प्रदर्शन ३० डिसेंबरपर्यंत सुरू राहील. उभी पिक, पशू प्रदर्शन, पुष्प प्रदर्शन, खाद्य बाजार व विस्तीर्ण परिसर व विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे सर्व एकाच ठिकाणी दररोज सलग ४ दिवस ही लोकांसाठी खास बाब आहे. मात्र या प्रदर्शनीमध्ये आकर्षणाचा केंद्र बिंदू असलेला 'सुलतान' रेडा सर्वांचा लक्ष वेधून घेत असून त्याची किंमत ५१ लाख एवढी आहे.

### असा आहे दररोज सुलतानचा आहार

सुलतान याचा दररोजचा चारा ५ किलो ग्रॅम शेंगदाणा पेंड, १० लिटर दूध, अंडे, हिरवा चारा, उस, घास, मका आदी लागते. तर मुरराहा मादी दिवसाला २७ लिटर दूध देते. सुलतानचे वय ५ वर्ष ३ महिने आणि वजन ११०० किलो आहे.

सुलतान मुरराहा जातीचा रेडा आहे. या रेड्याची किंमत ऐकून सर्व थक्क झाले आहे. महाराष्ट्र शासन आयोजित महा पशुधन एक्स्पो २०२३ मध्ये सुलतान याचा देशात द्वितीय



क्रमांक तर महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक आला आहे. सुलतानचे मालक पोपट श्रीधर गिरवले यांनी त्याची खूप काळजी घेतली आहे.

### लांब शिंगाची पंढरपुरी म्हैस वेधले लक्ष

पशु प्रदर्शनी विविध जातीच्या म्हशी, गाई व वळू याप्रदर्शनी मध्ये मुख्य आकर्षण आहे. लांब शिंगाची पंढरपुरी म्हैस, अतिशय सुंदर देखणे चपळ शर्यतीसाठी प्रसिद्ध असणारे पांढरा शुभ्र रंग अतिशय लांब धनुष्यबाणासारखे शिंग असलेली गायी व वळू प्रदर्शनीमध्ये मुख्य आकर्षण आहे.

### ३५ लिटर दूध देणारे होलस्टेन फ्रिसन

धिपाड देहवृष्टीचे शेती काम व दुधासाठी प्रसिद्ध असलेली लातूरची देवणी गाय व वळू प्रदर्शनीमध्ये मनमोहन टाकते. ३० ते ३५ लिटर दूध देणाऱ्या होलस्टेन फ्रिसन व जर्सी संकरित गायी या पशु प्रदर्शनीमध्ये दूध उत्पादन स्पर्धेत सहभागी झाले आहे.उत्तर भारतातील राठी, साहिवाल,पाकिस्तान सीमेवरची चोलीस्तानी गाईची जात पाहायला मिळेल. लाल कंधारी, खिल्लार, देवणी, गवळावू जातिवंत व उच्च दर्जाचे प्रजनन क्षमता असलेले वळू या प्रदर्शनीमध्ये पाहायला मिळेल.

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विम्याचे पैसे तत्काळ वाटप करा

## शासन व विमा कंपनीला धारेवर धरण्यासाठी ३ जानेवारीला चक्काजाम आंदोलन

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी –** अमरावती जिल्ह्यामध्ये मोर्शी वरूड चांदुर बाजार, अचलपूर, तिवसा यासह विविध तालुक्यामध्ये हवामान आणि भौगोलिक परस्थितीनुसार संत्रा फळांची लागवड हजारो हेक्टर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात केली जाते. जेवढे अधिकचे उत्पन्न यामधून आहे. तेवढ्याच प्रमाणात तोटाही आहे. त्यामुळेच पिकांना हवामान धोक्यांपासुन विमा संरक्षण दिल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने मदत होईल या करीता जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी १२ हजार रुपये भरून २०२२ – २३ मध्ये आंबिया बहार संत्रा फळ पिक विमा मोठ्या प्रमाणात काढलेला होता.

हवामानातील बदलामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन हे मिळत नाही. फळपिक नुकसान भरपाई मिळण्यासाठी एक उपाय म्हणून पुनर्रचित हवामान आधारीत फळ पीक विमा योजनेमध्ये मोठ्या अपेक्षेने विमा काढून सुद्धा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विमा मदत वेळेवर दिल्या जात नसल्यामुळे शेकडो शेतकऱ्यांनी मोर्शी उपविभागीय कार्यालयावर धडक देऊन शासनाला व विमा कंपनीला निवेदन देऊन फळ पीक विमा मदत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी केली असून ३ जानेवारी रोजी हिवरखेड येथे चक्काजाम आंदोलन करण्याचा करण्याचा इशारा शासन व रिलायन्स जनरल इन्शुरन्स विमा कंपनीला देण्यात आला.

सन २०२२–२३ चा पंतप्रधान फळ पिक विमा योजने अंतर्गत काढलेल्या संत्रा फळ पीक विम्याचा परतावा संपूर्ण व्याजासह तत्काळ मिळावा, हिवरखेड अंबाडा महसूल मंडळामध्ये दोन ट्रिगर लागल्याचे शासनाने मान्य केले असून तसा आदेश सुद्धा रिलायन्स इन्शुरन्स कंपनीला दिला असून सदर विमा कंपनी अमरावती जिल्ह्यातील २ हजार




संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे ८ कोटी रुपये देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

तसेच मोर्शी तालुक्यातील शेतक–यांना गारपीट अनुदानातून वगळण्या आलेले आहे. त्यांना देखील अनुदान मिळावे व २०२३–२४ चा खरीप पिक विमा ज्यांना अजूनपर्यंत मिळालेला नाही त्यांना देखील त्वरित पिक विमा मिळावा तसेच बांगलादेश संत्रा आयात कर कमी करावा याकरिता आपण आपले स्तरावर शासनास पाठपुरावा करून त्वरित सर्व प्रश्न निकाली काढावे अन्यथा आम्ही सर्व शेतकरी बुधवार दिनांक ३ जानेवारी रोजी हिवरखेड येथे चक्काजाम आंदोलनास बसणार असल्याचे निवेदन आज सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोर्शी तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांना सोबत घेऊन देण्यात आले.

त्यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके, शहर अध्यक्ष राहुल चौधरी, कांचन भाऊ कुकडे, किशोर भाऊ जिचकार, दिनेश भाऊ घोरमाडे, मनीष गुडधे, मायाताई वानखडे, विनोद गुडघे ,अनिकेत उबाळे, प्रकाश राऊत, अंबादास गुडधे, विनोदराव गुडधे राहुल ठोके, दिनेश गांजरे, ओंकार काळे, बाबाराव खाटगडे ,विनोद पांढरे, प्रमोद भाकरे, नरेंद्र राऊत, विनोद खटघडे, प्रकाश डगवार, मनोहर राणे, गजानन भामकर ,राहुल गावंडे, विकास बोराळकर, शरद काटोलकर ,उत्तम उपाशे, प्रमोद हरणे सह पाळा डोंगर यावली हिवरखेड दापोरी रिद्धपूर घोडदेव सह तालुक्यातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# 'भाजप देशाला गुलामगिरीत घेऊन जातोय', नागपूरच्या सभेतून राहुल गांधींचा भाजप आरएसएस वर हल्लाबोल

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक नागपूरः–** काँग्रेसच्या १३९व्या स्थापना दिनानिमित्त पक्षाने ठडड चा बालेकिल्ला असलेल्या नागपुरात भव्य सभा घेतली. 'तयार हैं हम' या टॅग लाईन खाली घेण्यात आलेल्या या सभेतून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार हल्लाबोल केला. 'भाजप देशाला पुन्हा गुलामीच्या दिशेने घेऊन जातोय', अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

यावेळी सभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, 'आज देशात दोन विचारधारांमध्ये लढा सुरू आहे. भाजपची विचारधारा राजेशाही आहे. त्यांच्याकडे वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करावे लागते. पण काँग्रेसमध्ये प्रत्येकाला बोलण्याचे स्वातंत्र्य आहे, आमच्या पक्षात लोकशाही आहे. आमचा विश्वास आहे की, सत्तेची लगाम देशातील नागरिकांच्या हातात असावी. पण, आज सर्वच संस्थेवर भाजपचा ताबा आहे. सर्व कुलगुरू एकाच संस्थेचे आहेत. कुलगुरू गुणवत्तेच्या आधारावर बनवले जात नाहीत. मोदी सरकारमध्ये गेल्या १० वर्षात किती लोकांना नोकऱ्या मिळाल्या. गेल्या ४० वर्षांतील बेरोजगारी आज सर्वाधिक आहे. भारतातील करोडो तरुणांची शक्ती वाया जात आहे. देशाची संपूर्ण संपत्ती दोन–तीन लोकांच्या हातात आहे.'



### ...तर स्वतःला ओबीसी कसे म्हणता?

'देशाचे पंतप्रधान मोदी भाषण करताना आपण ओबीसी असल्याचे सांगतात, पण ओबीसी नेत्यांना मात्र भाजपमध्ये मोठे पद नाही.मी लोकसभेत म्हटले होते की, देश ९० आयएएस अधिकारी चालवतात.

यातील किती ओबीसी किंवा आदिवासी आहेत? असे विचारल्यावर भाजपवाले गप्प झाले. ९० अधिकाऱ्यांपैकी केवळ ३ ओबीसी आहेत, प्रत्येक क्षेत्रात हीच परिस्थिती आहे. मग असे असेल तर तुम्ही स्वतःला ओबीसी कसे काय म्हणता?'

### आरएसएस संविधानविरोधी आहे

राहुल गांधी पुढे म्हणतात, 'लोक म्हणतात काँग्रेस ने काय केलं? स्वातंत्र्यापूर्वी देशामध्ये ५०० ते ६०० राजे होते, इंग्रज होते. देशातील लोकांना कुठलाच अधिकार नव्हता, गरीब व्यक्तीची जमीन आवडली तर राजा घेत होता. ब्रिटिशांच्या काळात काँग्रेस गरीबांसाठी लढली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जनतेला अधिकार दिले, या देशामध्ये लोकशाही व्यवस्था प्रस्थापित केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक संविधानविरोधी आहेत. तिरंग्याला सलामी देत नव्हते, मात्र आपल्याला सर्व अधिकार संविधानाच्या माध्यमातून मिळाले. आरएसएसची विचारधारा देशाला पुन्हा गुलामीत घेऊन जाण्याची आहे. देशातील जनतेला शक्ती देण्याचा आम्ही प्रयत्न करतोय.'

अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

# वनविभागाला 'मॅट' न्यायालयाचा दणका; आरएफओंचे प्रशिक्षण नियमबाह्य

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** वने आणि वन्यजीवांची सुरक्षा ऐरणीवर सोडत राज्यात ५०० वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना तब्बल दीड महिन्याच्या प्रशिक्षणाची सक्ती करणाऱ्या वनविभागाला महाराष्ट्र न्यायिक प्राधिकरण (मॅट) न्यायालयाने दि. २६ डिसेंबर २०२३ रोजी दणका दिला आहे. नियमबाह्य प्रशिक्षणावर 'ब्रेक' लावण्याचा आदेश 'मॅट' ने बजावल्यामुळे शिक्षण–प्रशिक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.पदोन्नत वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दीड महिन्याचे प्रशिक्षण घेण्याची सक्ती करणारा आदेश मे २०२३ मध्ये शिक्षण व प्रशिक्षण विभागाने जारी केला होता. आरएफओंनी प्रशिक्षण पूर्ण न केल्यास वेतनातून वसुली आणि शिस्तभंग कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानंतर आरएफओंनी प्रशिक्षणाची तयार केली. विदर्भातील आरएफओ कुंडल (सांगली) तर पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा कोकणचे आरएफओं ना चंद्रपूर वनअकादमी मध्ये प्रशिक्षणासाठी बाध्य करण्यात आले. त्यामुळे आरएफओं मध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. प्रशिक्षणासाठी हेलपाटे देण्याचा हा प्रयत्न मात्र 'मॅट'ने मोडीस काढला आहे.



### हा तर अनुदान लाटण्याचा घाट

एकीकडे विकास कामाकरिता वनविभागाला अनुदान मिळत नसताना शिक्षण व प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली कोट्यवधीचा निधी वन अकादमी चंद्रपूर व कुंडल (सांगली) येथे मिळत आहे. हा निधी खर्च घालण्यासाठी वनकर्मचारी अधिकाऱ्यांना सतत प्रशिक्षणावर टांगून ठेवले जाते. अनेकांची कौटुंबिक पारिवारिक समस्या, आजार याकडे लक्ष दिले जात नाही. सोयीप्रमाणे प्रशिक्षण मिळण्याची अपेक्षा असताना व जंगलाची सुरक्षा वाऱ्यावर ठेवत प्रशिक्षण केंद्र भरून ठेवण्याची सुपीक कल्पना एका वरिष्ठ वनाधिकाऱ्यांची असल्याची माहिती आह

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात

## अविष्कार २३ ' संशोधन स्पर्धा संपन्न

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय पोटे पाटील रोड, अमरावती येथे दि. २३ डिसेंबर २०२३ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय द्वारा जिल्हास्तरीय अविष्कार २०२३ स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये संशोधन प्रवृत्ती वाढावी यासाठी महाराष्ट्र सरकार व्दारे 'अविष्कार' ही स्पर्धा जिल्हास्तरीय, राज्य स्तरावर दरवर्षी करण्यात येते. याही वर्षी ही स्पर्धा पोटे महाविद्यालयातील महात्मा गांधी सभागृहात आयोजित करण्यात आली या







प्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामधील कला, वाणिज्य, विज्ञान तसेच विविध शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सृजनशील नवनिर्मिती, विविध संशोधनात्मक मॉडेलची निर्मिती करून असे विविध प्रोजेक्ट्स आणि पोस्टर स्पर्धेचा या प्रसंगी प्रदर्शन करण्यात आले होते.

यात सहभागी होणार–या स्पर्धकाला जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर जिंकण्याची आणि भरघोस पारितोषिक मिळण्याची संधी मिळाली आहे. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्या योग्य प्रोजेक्ट्सची पोटे इंजिनिअरिंगच्या स्टार्टअप साठी निवड होणार आहे. स्पर्धेत पदवी अभ्यासक्रम शिकणारे, पदव्युत्तर, संशोधनाचे विद्यार्थी तसेच प्राध्यापकदेखील सहभागी झाले होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिकांसोबतच शिष्यवृत्तीदेखील देण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. मागील वर्षीपेक्षा या वर्षी जास्त प्रमाणात या स्तुत्य आविष्कार २३ या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग नोंदवला असल्याचे डॉ. वैशाली धनविजय, विद्यापीठ समन्वयक, सं. गा. बा. विद्यापीठाच्या वतीने सांगण्यात आले. आविष्कार स्पर्धेत, क्छक्र, एढ, उचङ, झड, चझ, ––क अश्या सहा विभाग मधून णत्र श्रर्शीशश्र, झत्र ड्शींशश्र, आणि झझत्र श्रर्शीशश्र मधून प्रथम, द्वितीय, आणि तृतीय असे सर्व मिळून एकूण ५४ पारितोषिकाचे प्रमाणपत्र वितरण समारोपिय कार्यक्रमांप्रसंगी करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा भैयासाहेब मेटकर, मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर अमरावती विद्यापीठ यांच्या हस्ते , महाविद्यालयाचे संचालक डॉ डी. टी. इंगोले, डॉ मिहीप बरतेरे जिल्हा समन्वयक अविष्कार २०२३ यांच्या उपस्थितीत करण्यात आले तसेच विजेत्या संघाला बक्षिस वितरण करण्याकरिता प्रमुख अतिथी म्हणून रेमंडच्या लक्झरी कॉटनचे संचालक श्री विकास राजा, व्यवस्थापक, रेमंडच्या लक्झरी कॉटन अमरावती, श्री मिलिंद वानखडे रेमंडच्या लक्झरी कॉटन अमरावती, डॉ.डी.टी. इंगोले संचालक व प्राचार्य पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, डॉ. एम एम बरतेरे जिल्हा समन्वयक, आविष्कार २०२३, डॉ विवेक कुटे विभाग प्रमुख संगणक विभाग यांच्या हस्ते करण्यात आले. संपूर्ण अमरावती जिल्ह्यातून णत्र, झत्र आणि संशोधन स्तरावरील सहभागीं कडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. तसेच जिल्हा समन्वयक डॉ. एम एम बरतेरे, महाविद्यालय प्रभारी प्रा. ए. पी. पुंडकर आणि पी आर पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ची संपूर्ण आयोजक टीम यांनी आयोजन यशस्वीरित्या पार पाडले.

# विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाची कु. ऋतुजा ठाकरे विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रथम

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाची कु. ऋतुजा ठाकरे हिने दोन हजार पैकी १७५४ इतके सर्वाधिक गुण मिळवून विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. तिच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र–कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विभागाच्या समन्वयक प्रा. अरुणा तसरे यांनी अभिनंदन केले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आवश्यक असलेल्या विषयाच्या पदव्युत्तर शिक्षणाची सोय शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था वगळता अमरावती विद्यापीठ क्षेत्रात कुठेच नसल्याने विद्यापीठ परिक्षेत्रातील शहरी व ग्रामीण भागातील होतकरु विद्यार्थ्यांना मानसशास्त्र विषयाच्या पदव्युत्तर उच्च शिक्षणाचे दालन विद्यापीठाकडून उपलब्ध करुन देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी सुध्दा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. विद्यापीठाने उन्हाळी २०२२–२३ सत्रात घेतलेल्या एम.ए. मानसशास्त्र भाग –२ सेमि.–४ परीक्षेत कु.ऋतुजा हिने सर्वाधिक गुण प्राप्त करुन प्रथम येण्याचा मान मिळविला. ती आसेगाव येथील आदिवासी निवासी शाळेमध्ये विशेष शिक्षक म्हणून कार्यरत श्री सुभाषराव ठाकरे यांची मुलगी असून अमरावती शहरातील गिरजा कॉलनी येथील राहिवाशी आहे. कु. ऋतुजाने ९.२४ ग्रेड प्राप्त केली आहे. कु. ऋतुजा हिचे विभागातील शिक्षक प्रा. वनिता राऊत, प्रा.



प्रवीणकुमार मोहोड, प्रा. श्रद्धा हरकंचे, प्रा. मनिषा लकडे, प्रा. कल्पना तायडे, श्री.राजू इंगोले यांनी सुध्दा अभिनंदन केले आहे.

# ३१ डिसेंबरला गजानन महाराज मंदिर रात्रभर राहणार खुले

**भक्तांसाठी आनंदाची बातमी**

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक शेगाव –** श्रीसंत गजानन महाराज संस्थानतर्फे चालू वर्षाला निरोप व नूतन वर्षाच्या स्वागतानिमित्त तसेच श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता समाधी मंदिर रविवार, ३१ डिसेंबर रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानतर्फे देण्यात आली आहे. दरवर्षी नवीन वर्षाच्या निमित्ताने श्रींच्या दर्शनासाठी शेगावात मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. येणार्या सर्व भाविकांना श्रींच्या समाधी दर्शनाचा लाभ मिळावा व होणार्या गर्दीचे नियोजन योग्य रीतीने व्हावे, हा यामागे उद्देश आहे. रात्री येणार्या भाविकांना पहाटे श्रींचे दर्शन, महाप्रसाद घेता येणार आहे. श्रींच्या भाविकांसाठी संस्थानच्या वतीने



दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण मंडप, श्रींची गादी तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्तनिवासामध्ये नियमानुसार अल्पदरात राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू राहणार आहे.

# ६ जानेवारीला आदित्य सूर्याच्या L1 पॉइंटवर

## किती वाजता पोहोचणार? इस्रो कडून वेळ जाहीर

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक श्रीहरिकोटा–** भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोच पहिल सौर मिशन आदित्य ङ १ वर लवकरच आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचणार आहे. नवीन वर्षात ६ जानेवारीला आदित्य सूर्याच्या ङ १ म्हणजे लॅग्रेज पॉइंटवर पोहोचेल. इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी आदित्य किती वाजता पोहोचणार त्याची वेळ सुद्धा जाहीर केलीय. भारताची ही पहिलीच सूर्य मोहिम आहे. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये सुद्धा आदित्य ङ १ मिशनबद्दल प्रचंड उत्सुक्ता आहे. यावर्षी इस्रोच्या वैज्ञानिकांनी चांद्रयान–३ मिशन यशस्वी करुन दाखवलं. भारताच विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ यशस्वीरित्या उतरलं. भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणार जगातील पहिला देश ठरला. त्यामुळे आदित्य ङ १ मिशनबद्दल प्रचंड उत्सुक्ता आहे.

आदित्य ङ१ मिशन यावर्षी २ सप्टेंबरला लॉन्च करण्यात आलं होतं. या यानाचा सूर्याच्या दिशेने प्रवास सुरु आहे. वैज्ञानिकांची




आदित्या ङ १ वर पूर्णपणे नजर आहे, असं गुरुवारी एस सोमनाथ यांनी मुंबईत एका कार्यक्रमात सांगितलं. आता आदित्य यानाची इंजिन ऑन केले जातील. जेणेकरुन यानाला हॅल ऑर्बिटमध्ये प्रवेश करता येईल. लॅग्रेज पॉइंट तो बिंदू आहे, जिथे पृथ्वी आणि सूर्यामधील गुरुत्वाकर्षण निष्क्रिय असतं.आदित्य ङ१ च्या सर्व पेलोडच परीक्षण करण्यात आलय असं इस्रो प्रमुख एस सोमनाथ यांनी सांगितलं. सर्व पेलोड व्यवस्थित काम करतायत व चांगला डेटा देतायत असं ते म्हणाले. आदित्य ङ१ पॉइंटवर पोहोचल्यावर त्याच स्थान निश्चित केलं जाईल. आदित्य ङ१ मधील उपकरण व्यवस्थित काम करतील, तो पर्यंत माहित मिळत राहील, असं सोमनाथ म्हणाले. या मिशनमधून सूर्यावर येणारी वादळं, सौर कोरोना आणि अवकाश हवामानाची अनेक रहस्य उलगडली जातील.

# थर्टीफस्टला शहरातील उड्डाण पूल राहणार बंद रात्री १२.३० पर्यंतच फोडता येणार फटाके





## स्टंटबाजांवर राहणार पोलिसांची विशेष नजर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी, पोलिस यंत्रणा सतर्क असून, हजारो पोलिस कायदा व सुव्यवस्था कायम राहावी म्हणून थर्टीफस्टला रस्त्यावर असतील.पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी त्यादृष्टीने आपल्या अधिनस्थ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सुरक्षेचा आढावा घेतला. नववर्षाचे स्वागत करीत असताना जीवितहानी किंवा नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान होऊ नये, यादृष्टीने पोलिस आयुक्त उपायुक्तांसह चार सहायक पोलिस आयुक्त, ८० पोलिस अधिकाऱ्यांसह हजारो पोलिस, गुन्हे शाखा, विशेष शाखेची स्वतंत्र पथकेही तैनात ठेवण्याचे आदेश बैठकीत सोपींनी दिले.

वेगात वाहन चालविणाऱ्यांवर वॉच ठेवण्याकरिता वाहतूक पोलिस विभागाच्या वतीने रहदारीच्या मुख्य मार्गावर इन्टरसेप्टर वाहन तैनात असेल, मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांच्या उत्साहाला अशा दिवशी उधाण येते. त्यांच्यावरही लक्ष केंद्रित करण्यासाठी आदल्या दिवसांपासूनच शहराच्या विविध भागांत ड्रिंक ॲण्ड ड्राइव्हची मोहीम राबविल्या जाणार आहे. पोलिस पथक वाहनांसह फूट पेट्रोलिंग करतील.

### १२.३० वाजेपर्यंत फोडा फटाके

ऑनलाईन ई-कामर्स फटाके यावर पूर्णतः बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच, ३१ डिसेंबर नूतन वर्षानिमित्त फटाके फोडण्याची वेळ रात्री ११.५५ ते रात्री १२.३०. वाजेपर्यंत राहील. ३१ डिसेंबर रोजी अवैध धंदे व दारु विक्रेत्यांविरुध्द विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच, सर्व आस्थापनाधारकांनी आपले आस्थापनेच्या आतील व बाहेरील बाजूस खासगी सुरक्षा रक्षक तैनात करुन आस्थापनेच्या जागी कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. त्यामध्ये सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी सूचना दिलेल्या आहेत. तसेच, कारवाई करण्याकरिता पोलीस आयुक्तालय स्तरावर विशेष पथक गठित करण्यात आलेले आहेत.

### स्टंटबाजांवर असेल वॉच

अनेक निर्जनस्थळी किंवा मुख्य रहदारीच्या रस्त्यांवर काही उत्साही दुचाकीस्वारांकडून स्टंटबाजी होऊ नये, याकरिता पूर्व व पश्चिम वाहतूक पोलिसांच्या पथकांचा वॉच असेल.

### विविध ठिकाणी नाकाबंदी

या बंदोबस्तामध्ये १ पोलीस उपायुक्त, ४ सहायक पोलीस आयुक्त तसेच, ८० पोलीस अधिकारी, ८०० अंमलदार (वाहतूक विभाग, गुन्हेशाखा व इतर विविध पथके) नेमण्यात आले आहे. पोलीस विभागाकडून शहराच्या प्रमुख चौकात तसेच, विविध पोलीस ठाणेच्या हद्दीतील आवश्यक ठिकाणी बॅरीकेटींगद्वारे नाकाबंदी करण्यात येणार आहे.

### ऑर्केस्ट्रा व वाद्यांसाठी परवानगी आवश्यक

राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने जारी केलेल्या निर्देशानुसार बंद जागेखेरीज इतर ठिकाणी ध्वनिक्षेपकासाठी ध्वनीची मर्यादा राखून वाजविण्यांस सकाळी सहा ते मध्यरात्री १२ पर्यंत सूट देण्यात आली आहे. हॉटेल, लॉन व इतर ठिकाणी ऑर्केस्ट्रा, लॉनकरिता वाद्य वाजविण्यासाठी पोलिस विभागाची ऑनलाइन परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँक परिसरात बसणार शिवरायांचा पुतळा

## जिल्हा बँकेच्या सभेत अनेक महत्वाचे प्रस्ताव पारित

**दि२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यासोबतच बेरोजगारांना विविध उद्योगांसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राशी संलग्नीकरणासारखे महत्त्वाचे प्रस्ताव गुरुवारी (ता.२८) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पारित करण्यात आले.




जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.शहरात केवळ शिवटेकडीवरच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असून त्याठिकाणी अभिवादनासाठी जाणे सर्वांना शक्य होत नाही. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आवारात शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याचा ठराव मागील बैठकीत मांडण्यात आला होता, मात्र पुतळ्याच्या विषयासंदर्भात त्या बैठकीत निर्णय होऊ शकला नाही. परंतु गुरुवारी झालेल्या बैठकीत या विषयाला हिरवी झेंडी देण्यात आली. याशिवाय मुख्यमंत्री ग्रामोद्योग रोजगार योजनेंतर्गत बेरोजगार युवकांना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योगांसाठीजिल्हा बँकेमार्फत कर्जपुरवठा करण्यासाठी बँकेचे संलग्नीकरण करण्यास सुद्धा या बैठकीत मान्यता देण्यात आली. याव्यतिरिक्त बँकेच्या कर्मचाऱ्यांचा ३० लाखांचा अपघात विम्याच्या मुद्यावरसुद्धा चर्चा करण्यात आली. बैठकीला उपाध्यक्ष अभिजित ढेपे, संचालक प्रा. नरेशचंद्र ठाकरे, अजय मेहकरे, चित्रा डाहाणे, आनंद काळे, जयप्रकाश पटेल, रवींद्र गायगोले, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बकाल उपस्थित होते.

**विरोधकांची अनुपस्थिती**

गुरुवारी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत बबलू देशमुख गटातील सर्व संचालक अनुपस्थित असल्याने चांगलीच चर्चा रंगली होती. बैठकीत मांडलेल्या सर्वच विषयांना विरोधी गटातील संचालकांकडून विरोध करण्यात येत असल्याचे उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी सांगितले.

# नागपुरच्या महारॅली जिल्ह्यातुन १५ हजारांवर कार्यकर्ते सहभागी

## आ. यशोमती ठाकुर,जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांचे नेतृत्व



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

काँग्रेसच्या १३९ व्या स्थापना दिनानिमित्य नागपुर येथे आयोजित महासंमेलन व महारॅलीत जिल्ह्यातील ग्रामिण भागातील सुारे १५ हजारंवर कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी आ. यशोमती ठाकुर, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वात सहभागी झाले होते.

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या १३९ व्या स्थापना दिनानिमित्त काँग्रेस पक्षाचे महासंमेलन नागपूर येथे गूरूवारी दुपारी १.३० वा. आयोजित करण्यात आले होते.या अधिवेशनाला राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे,काँग्रेस संसदीय दलाच्या अध्यक्षा खा. सोनिया गांधी, खा. राहुल गांधी,प्रियंका गांधी यांची प्रमुख उपस्थीती होती.या निमित्य महारॅली देखील काढण्यात आली. या रॅली आणि महासंमेलनात ग्रामीण भागातून १५ हजार कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.तर प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये आ. यशोमती ठाकुर, जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख, आ. बळवंत वानखडे, माजी आ. वीरेंद्र जगताप, हरीभाऊ मोहोड, सुधाकर भारसाकडे, गिरीश कराळे,संजय वानखडे,श्रीकांत गावंडे, धनंजय देशमुख, विनोद चौधरी,प्रदीप देशमुख, दिलीप काळबांडे, सेतू देशमुख, संजय बेलोकार, अतिश शिरभाते, सुनील गावंडे यांचा समावेश होता.

# अमरावती जिल्ह्यात ५ नवे रुग्ण आढळले

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यात पुन्हा एकदा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. गुरुवारी ५ नव्या कोरोना बाधित रुग्णांची नोंद आरोग्य प्रशासनाने केली आहे. प्राप्त माहितीनुसार ५२ संशयित रुग्णांचे सॅम्पल हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. यातील ५ रुणांचा अहवाल म्हणजेच दहा टक्के रुग्णांचे अहवाल कोविड पॉझिटिव्ह आढळून आला आहे. यामध्ये अमरावती शहरातील २ रुग्ण असून ३ रुग्ण हे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात उपचारासाठी आलेले रुग्ण आहेत. यातील एक महिला रुग्ण अकोला जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती आरोग्य विभागाकडून मिळालेली आहे.

# तपोवन संस्थेच्या विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य : उपजिल्हाधिकारी लहाने

## दाजीसाहेब पटवर्धन यांची १३२ वी जयंती साजरी




**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आपल्या उत्तुंग कर्तृत्वातून समाजाला माणुसकीची अनुभूती करून देणारे तपोवन संस्थापक डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या १३२ व्या जयंती सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून एक गौरवास्पद अनुभूती होत आहे. याचे कारण म्हणजे, पाच वर्ष या संस्थेचा संचालक पदाचा कार्यभार सांभाळतांना दाजीसाहेबांचे कर्तृत्वाच्या विचारधारेचे पाईक होता आले. या संस्थेच्या विकासामध्ये खारीचा वाटा म्हणून कार्य करता आले याचा आपणास अभिमान वाटतो. प्रामुख्याने रा.सु गवई अहवालाच्या मदतीने प्रस्ताव तयार करीत संस्थेसह राज्यातील सर्व कुष्ठबांधवांना शासकीय मदत देता आली. दाजीसाहेबांवर श्रद्धाआणि संस्थेशी आत्मयता यामुळे येथील सर्वांगीण विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करीत राहील, असे विश्वास उपजिल्हाधिकारी अजय लहाने यांनी व्यक्त केला.

अमरावतीच्या पावनभूमीतील निष्काम कर्मयोगी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांचा १३२ वा जयंती सोहळा तपोवन येथील शिव उद्यान येथे गुरूवारी २८ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ६ वाजताच्यादरम्यान पार पडला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई तर प्रमुख अतिथींमध्ये उपजिल्हाधिकारी अजय लहाने, माजी खा. अनंतराव गुढे, अ.भा गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरीच्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे, बाबा - आमटे यांच्या आनंदवन येथील सुधाकर कडू, प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, अरूण देशमुख, *माजी नगरसेवक प्रदीप बाजड, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गोविंद कासट, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. प्रतिक राठी, सचिव सहदेव गोळे, नियामक समिती सदस्य भगवंतसिह दलावरी, झुबीन दोटीलावला, विवेक अ. मराठे,अश्वीन आळशी, विद्याताई देसाई, भिमराव ठवरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची क सुरुवात मान्यवरांच्याहस्ते डॉ. दे शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला हारार्पण, दीपप्रज्वलन तसेच मान्यवरांच्या स्वागताने झाली. यानंतर व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांनी दाजीसाहेबांच्या स्मृतीला व कार्याला उजाळणी देत संस्थेच्यासर्वांगीण विकासाला सहकार्य करण्याचा मानस व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋषीकेश देशपांडे यांनी केले. संचालन दाजीसाहेबांचे अनुयायी व माजी मुख्याध्यापक अब्दुल रशीद यांनी तर आभार सचिव सहदेव गोळे यांनी मानले. कार्यक्रमाला माजी सहपरिवार विद्यार्थी, संस्थेतील कर्मचारी वर्ग, समाजातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तपोवन संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द**

एकीकडे काही व्यक्ती संस्थेच्या विकासासाठी झटत आहेत तर काही या संस्थेवर व येथील प्रशस्त जागेवर कुदूरी ठेवून आहे. त्यामुळे संस्थेची सुरक्षा आणि समाजाभिमुख विकास या दोन्ही ध्येयावर कार्यरत राहून दाजीसाहेबाच्या तपोवन संस्थेचा सर्वांगीण समाजाभिमुख विकास करण्यास आपण कटीबद्ध आहोत, असा विश्वास विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन वे नवनियुक्त अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी व्यक्त केला.

रक्तदान ही
जनसामान्यांची सेवा,
यालाच मानूया ईश्वरसेवा.

# खोपडा येथील प्रकल्पग्रस्ताचे मोर्शी तहसील समोर आमरण उपोषण

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**



निम्न चारघड प्रकल्पा मध्ये मोर्शी तालुक्यातील समाविष्ट खोपडा गावातील प्रकल्पग्रस्त ४ डिसेंबर रोजी जिल्हा कचेरीवर धडकले होते.त्यावेळी निवेदन देत आंदोलनचा इशारा देण्यात आला होता.परंतु निवेदनातील विषय निम्न चारघड प्रकल्प मौजा खोपडा प्रकरण १३-१४ अंतर्गत भुसंपादित केलेल्या सुधारित बांधकाम मूल्यांकनच्या रकमेत असलेल्या तफावतीची स्पष्टता नं केल्या मुळे व मूल्यांकनामध्ये पारदर्शकता नसल्यामुळे अखेर खोपडा गावातील प्रकल्पग्रस्तानी २६ डिसेंबर ला निवेदन देऊन २७ डिसेंबर पासून मोर्शीतील उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधीकऱ्याच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला.खोपडा येथील ४९८ प्रकल्पग्रास्ताना मोबदला मिळाला असून कार्यकारी अभियंता अमरावती प्रकल्प बांधकाम कार्यालयातील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात चुकीचे मूल्यांकन केल्यामुळे फार कमी प्रमाणात मोबदला मिळाला असून काही लोकांना दुपटीने रक्कम वाढवून दिली असल्याचा आरोप गावकर्यांनी केला.खोपडा गावातील मालमतेच्या फेरमूल्यांकन बाबत प्राप्त १७० अर्जापैकी ११९ अर्जदारांना वाढीव २.३२ कोटी रक्मेस स्थगिती देऊन पुन्हा फेरमूल्यांकन करून वाटप करावे या प्रकरणाच्या रकमेत असलेल्या तफावतीची स्पष्टता व पारदर्शक चौकशी करून ४९८ प्रकल्पग्रस्ताना घरकुलचा लाभ देण्यात यावा आणि पूणवर्सन मधील उरुवतीत नागरी सुविधाची कामे पूर्ण करावी अशी गावकर्यांनी मागणी केली आहे.सर्व गावातील प्रकल्पग्रास्तानी जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही असा निर्णय सर्व गावकर्यांनी घेतला आहे.सदर उपोषणामध्ये अमोल कोठाडे,गौतम गजबे,प्रफुल लोणपांडे,प्रांजली लुंगे,प्रभुदास सूर्यवंशी,चंद्रकांत जवंजाळ,नरेंद्र रामटेके सह खोपडा गावतील सर्व नागरिक उपस्थित होते.

# विष्णोरा येथील स्मशानभूमी जवळ पकडलेल्या अजगराला घाटलाडकी येथील सर्पमित्रांनी दिले जीवनदान

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**



अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील सायंकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान पोरगव्हाण येथील श्रीकांत सोलव हे आपल्या टाटा एस वाहनाने विष्णोऱ्याकडून खेड फाटा मार्गाने उदखेड येथे जात असताना विष्णोरा येथील स्मशानभूमी जवळ त्यांच्या वाहनाच्या आडवा चक्क आठ फुटाचा अजगर आडवा आला त्यामुळे त्यांनी त्यांचे वाहन थांबून ठेवले अशातच त्यांनी विष्णोरा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रदीप ठाकरे पत्रकार अनिल ठाकरे यांना फोनवर माहिती दिली वाहनाच्या समोर एक अजगर आहे. त्यांनी तात्काळ धाव घेऊन प्रदीप ठाकरे अनिल ठाकरे यांनी त्या ठिकाणी जाऊन परिसरातील सर्पमित्रांना फोनवर माहिती दिली अशातच काही कामानिमित्त घाटलाडकी येथील सर्पमित्र हे त्याच मार्गाने जात असताना ते अचानक त्या ठिकाणी उभे राहिले व गर्दी कशाची आहे हे पाहून त्यांनी विचारणा केली असता तेथील उपस्थित नागरिकांनी. येथे अजगर साप आहे असे सांगितले व लगेच घाटलाडकी येथील त्या व्यक्तींनी आम्ही सर्पमित्र असल्याचे सांगून त्या अजगराला पकडले व त्याला पकडून वनविभागाच्या जंगलामध्ये सोडून देण्याकरिता ते घेऊन गेले. त्यावेळी त्या अजगर सापाचा रेस्क्यू करत असताना सर्पमित्र पवन सव्वालाखे सागर सातव घाट लाडकी व विष्णोरा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रदीप ठाकरे, पत्रकार अनिल ठाकरे, सुभाष ठाकरे, श्रीकांत सोलव, अक्षय गिरी ,सलमान शेख, चेतन पोहकार यावेळी उपस्थित होते.

# कोरोनाची लस घेतली असेल तर एक नंबर दाबा

## सावधान.... . ऑनलाइन फसवणुकीचा नवा फंडा : सतर्क राहण्याची गरज

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ऑनलाइन फसवणूक कोणत्या मार्गाने होईल, याची आता शाश्वती राहिलेली नाही. आता चक्क कोरोनाची लस घेतली का? कोणती लस घेतली? यासाठी एक नंबर दाबा, तमुकसाठी दोन नंबर दाबा, असे फोन कॉल येऊ लागले आहेत. नंबर दाबताच बँक खात्यातील रक्कम अलगद 'डेबिट' होण्याचे प्रकार घडत आहेत.




ऑनलाइन फसवणुकीच्या या प्रकाराने आता एक नवीनच वळण घेतले आहे. कोरोनाकाळात अनेकांनी लस घेतली. याच गोष्टीचा फायदा घेत ऑनलाइन भामट्यांनी शक्कल शोधून काढली आहे. एखाद्या व्यक्तीला फोन कॉल येतो, त्यावरून आपण कोरोनाची लस घेतली असेल तर एक नंबर दाबा,कोरोनाच्या दोन्ही लसी घेतल्या असतील तरदोन नंबर दाबा, जर कुठलीही लस घेतली नसेल तर तीन नंबर दाबा, असा आशयाचा आवाज ऐकू होतो. याला प्रतिसाद दिल्यास ओटीपी व त्यानंतर 'व्हेरिफिकेशन कोड' येत असल्याचेही सांगितले जात आहे. याच माध्यमातून ऑनलाईन मार्केटिंगचे व्यवहार होऊन तुमच्या बँक अकाउंटमधील पैसे गायब होत आहेत. असा प्रकार अन्य राज्यात घडला असताना अशी प्रक्रिया आता राज्यातही दिसून येत आहे.अश्यानिनावी फोन कॉल्सना प्रतिसाद दिल्यानंतर बँकेतील रक्कम गायब होत असल्याने वेळीच सतर्क राहून अशा कॉल्सना प्रतिसाद देऊ नये, असे आवाहनही सायबर शाखेने केले आहे.

# अश्लील शिवीगाळ प्रकरणी माजी प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे यांच्या विरूध्द दखलपात्र गुन्हे दाखल करण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक मुर्तिजापुर**

स्थानिक श्री. गाडगे महाराज महाविद्यालय, येथीलमाजीप्राचार्य डॉ. संतोष ठाकरे यांनी केलेल्या अश्लील शिवीगाळी संदर्भात मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठाने दखलपात्र गुन्हे नोंदविण्याचे आदेश दिलेले आहेत. डॉ. संतोष ठाकरे यांच्याविरूध्द महाविद्यालयातील प्राध्यापकांनी दि. ०८.११.२०२० रोजी मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा, अमरावती यांच्याकडे रितसर तक्रार दाखल केली होती, त्याच तक्रारीचा संदर्भ घेवुन डॉ. संतोष ठाकरे यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांना दि. ११.११.२०२० रोजी शिवीगाळ केली होती व सदर शिवीगाळीचे शिवीगाळीचे व्हीडीओ रेकॉर्डीग ग्रंथपाल डॉ. नितिन सातपुते यांनी केले होते. त्या संदर्भात महाविद्यालयातील प्राध्यापक दिलीप शहाडे, डॉ. राकेश बडगुजर, डॉ. सचिन माटोडे, श्री. अक्षय चव्हाण व डॉ. नितिन सातपुते यांनी दि. १३.११.२०२० रोजी शहर पोलीस स्टेशन, मुर्तिजापुर येथे डॉ. संतोष ठाकरे यांच्या विरूध्द तक्रार दाखल केली होती परंतु पोलीसांनी अदखलपात्र गुन्हयांची नोंद केली त्यामुळे ग्रंथपाल डॉ. नितिन सातपुते यांनी मा. न्यायालय, मुर्तिजापुर येथे डॉ. संतोष ठाकरे यांच्याविरूध्द दखलपात्र गुन्हे नोंदविण्यासंदर्भात खाजगी तक्रार केली होती त्यानुसार मा.न्यायालयाने भा.दं.वि. कलम २९४. ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा नोंदविला होता परंतु सदर न्यायलयाच्या आदेशाला प्राचार्याचे कक्ष सार्वजनिक ठिकाण नसल्याचे कारण देवुन जिल्हा सत्र न्यायालय, अकोला यांनी रद्द केले व जिल्हा सत्र न्यायालय, अकोला यांच्या हया आदेशाला डॉ. नितिन सातपुते, ग्रंथपाल यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले त्यानुसार कलम २९४ मधील व्याख्येनुसार प्राचार्याचे कक्ष हे सार्वजनिक ठिकाण असल्याचे सिध्द झाले.

तसेच सदर व्हीडीओ मध्ये अश्लील शिवीगाळ करतांना चार खुन करण्याची धमकी महाविद्यालयातील संबंधीत प्राध्यापकांना डॉ. संतोष ठाकरे यांनी दिली तसेच महिलांबद्दल अत्यंत घाणेरडे व अश्लील शिवीगाळ केल्याचे निरीक्षण मा. उच्च न्यायालयाने आर्वजुन नोंदविले त्यामुळे डॉ. नितिन सातपुते यांची याचिका मान्य करण्यात आली व जिल्हा सत्र न्यायालयाची दि. १०.८.२०२२ चे आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्द केले व प्रथम श्रेणी न्यायालय, मुर्तिजापुर यांच्या आदेशानुसार भा.दं.वि. कलम २९४, २०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवुन कार्यवाही करण्यात यावी तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना असे आदेश दिले की, अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये कलम १५५ च्या कलम २ अन्वये कार्यवाही करण्याबाबतचे परिपत्रक काढण्याचे आदेशही मा. उच्च न्यायालयाने पारीत केले.मा. उच्च न्यायालयाने आपल्या १० पानी निकालात संतोष ठाकरे यांनी महिलांवर केलेल्या अश्लील वक्तव्याची गंभीर दखल घेत संतोष ठाकरे याने केलेली शिवीगाळ अधोरेखीत करत गंभीर ताशेरे ओढले आहेत. संतोष ठाकरे सारखे व्यक्ती उच्च शिक्षण प्रणालीमध्ये असेण व त्याचे समर्थन करणारे व्यक्ती असणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. संतोष ठाकरे सारखेप्रवृत्तीचे लोक कायद्याच्या पळवाटा शोधुन स्वच्छत प्रतिमा असल्याचे जे नाटक करतात त्याला हा निर्णय आरसा दाखवणारा आहे. मा.उच्च न्यायालयाने प्राचार्य कक्षात प्राध्यापकांना अश्लील शिवीगाळ करणे हया बाबीची नोंद घेत प्राचार्य कक्ष हे एक सार्वजनिक जागा असुन त्यामध्ये केलेले अश्लील वक्तव्य ही बाब दखलपात्र गुन्हा असल्याचे नोंदविले आहे.

# राज्यात नववर्षाचे स्वागत धुके, थंडी, पावसासह होण्याची शक्यता



**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

राज्यात मोठ्या प्रमाणात तापमानात घट झाली आहे. पुणे, मुंबईसह राज्याच्या कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट नोंदवण्यात आली आहे. राज्याच्या काही भागात थंडीचा कडाका असून ही थंडी नववर्षात देखील कायम राहण्याची शक्यता आहे. शिवाय नववर्षाचे स्वागत थंडीसोबत धुके आणि रिमझिप पावसाने होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. उत्तर भारतात असलेली थंडीची लाट आणि काही भागात सुरू असलेला पाऊस आणि काही भागात सुरू असलेली बर्फवृष्टी यामुळे राज्यातदेखील तापमानात मोठी घट झाली आहे. बुधवारपासून पुन्हा तापमानात घट होणार आहे.

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, ३०-३१ डिसेंबर रोजी मुंबई, ठाणे, पालघर आणि पुण्यासह विदर्भ, मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत किमान तापमानात हळूहळू घट होण्याची शक्यता आहे. किमान तापमानात फारशी घट होणार नसली तरी थंडी मात्र जाणवेल. राज्यावर सध्या कुठलीही हवामान यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे २९ तारखेपर्यंत हवामान कोरडे राहून पुढील दोन दिवस पहाटे हलके धुके पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ३० डिसेंबरपासून २ जानेवारीपर्यंत विंड इंटरॅक्शनमुळे वायव्य व मध्य भारत तसेच महाराष्ट्राच्या उत्तरी भागात ढगाळ हवामान राहण्याची शक्यता आहे. हे हवामान हळूहळू पूर्वेच्या दिशेने सरकत राज्यात उत्तर मध्य महाराष्ट्रावरून विदर्भाच्या दिशेने पुढे जाईल. यामुळे नवीन वर्षात आकाश अंशतः ढगाळ राहून दुपारनंतर सामान्यतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तुरळ ठिकाणी रिमझिम पाऊस होण्याची शक्यता आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

## विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**





पी. आर. पोटे पाटील एजुकेशनल ग्रुप अमरावती येथे २८ डिसेंबर २०२३ ते ०१ जानेवारी २०२४ दरम्यान क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या क्रीडा सप्ताहाचे उदघाटन डेप्युटी डायरेक्टर स्पोर्ट अँड युथ अफेअर्स महाराष्ट्र श्री विजय संतान यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी क्रीडा मशाल पेटवून व खेळण्याचा आनंद घेऊन या महोत्सवाची सुरवात करण्यात आली. या क्रीडा महोत्सवामध्ये अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, आर्किटेक्चर महाविद्यालय , फार्मसी महाविद्यालय , आयुर्वेदिक महाविद्यालय, कृषी महाविद्यालय , नर्सिंग महाविद्यालय, बीएड महाविद्यालय च्या विद्यार्थ्यांनी आपल्या टीमचे प्रात्यक्षिक यावेळी दाखवले. या क्रीडा महोत्सवा मध्ये क्रिकेट, कबड्डी, खो खो. व्हॉलीबॉल, चेस, कॅरम, टेबल टेनिस, बॅडमिंटन, फुटबॉल या खेळांचा समावेश आहे.महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा जिंकणाऱ्या प्रत्येक संघाकरिता विविध पारितोषिक देण्यात येणार आहेत.उदघाटन प्रसंगी श्री विजय संतान यांनी विद्यार्थ्यांची संवाद साधला यात त्यांनी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी खेळाडूवृत्ती जोपासून विविध मैदानी खेळ खेळावे असे आवाहन केले. तसेच अभ्यासासोबत खेळलाही जीवनात महत्वाचे स्थान असले पाहिजे तेव्हाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल असेही प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

क्रीडा सप्ताह उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले, पी. आर. पोटे पाटील आयुर्वेदिक महाविद्यालयाचे डीन डॉ श्यामसुंदर भुतडा, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुज्ञान गवई , पी. आर. पोटे पाटील फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ दीप्ती रुईकर, पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. नितेश चौधरी , पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय देशमुख , पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कुलचे प्राचार्य प्रा. सचिन दुर्गे , पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ मोहम्मद झुहेर, पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कुलचे उपप्राचार्य प्रा. सोनल निस्ताने, स्टुडन्ट वेल्फेअर डीन डॉ सनप्रीतकौर नंदा, स्पोर्ट डायरेक्टर प्रा. संदीप ठाकरे, प्रा. सुयोग तायडे यांसह सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्याबाहेरील शेतीचा अभ्यास किती शेतकऱ्यांनी केला अर्ज?

## २५ शेतकऱ्यांची होणार निवड : कृषी विभागाची शेती अध्ययनासाठी योजना



**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२३-२४ अंतर्गत शेतकऱ्यांचा राज्याबाहेर प्रक्षेत्र भेट कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. जिल्ह्यातून यासाठी २५ शेतकऱ्यांची निवड कृषी विभागाकडून केली जाणार आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या नानाविध कल्पनांचा अभ्यास यातून मिळणार आहे.अभ्यास दौऱ्यातून शेतकरी प्रयोगशील होणार आहेत. यासाठी शेतकऱ्यांची निवड करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी असणार आहे. अधिक अर्ज प्राप्त झाल्यास लॉटरी पद्धतीने निवड केली जाणार आहे.राज्यामधील प्रगतिशील शेतकऱ्यांची शेती अथवा बाहेर राज्यातील शेतकऱ्यांनी साधलेली प्रगती याचा अभ्यास या अभ्यास-दौऱ्यात करता येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना स्थळ आणि संबंधित जागा सुचविली जाणार आहे.शेतकरी अभ्यासदौयामध्ये शेतकयांना कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन विभागाकडून प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतात भेट घडवून आणता येणार आहे. शून्य मशागतीपासून ते बांबू लागवड प्रशिक्षण, इतकेच नव्हे तर विविध पिकांची माहिती यात असेल.

**कधीपर्यंत अर्ज करता येणार?**

शेतकऱ्यांना अर्ज सादर करण्यासाठी ८ जानेवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या अभ्यासदौयासाठी अद्याप एकही शेतकऱ्यांचा अर्ज सादर झालेला नाही.

**कोणाला अर्ज करता येणार?**

या मोहिमेसाठी शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी बचतगट आणि वैयक्तिक स्वरूपाच्या शेतकऱ्यांना अर्ज करता येणार आहे.

# राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत प्रत्येक गावात १५ सिंचन विहरी

## चार लाखांचे मिळणार अनुदान




अरुण जोशी

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शेतात सिंचनाची सोय व्हावी, शेतकऱ्याने अधिकाधिक पिके वर्षभर घ्यावीत, यासाठी शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून सिंचन विहीर मंजूर केली जाते. यावर्षीपासून सिंचन विहिरीसाठी चार लाखांचे अनुदान शासनाकडून दिले जात आहेत. विशेष म्हणजे, प्रत्येक गावात १५ विहिरी खोदण्यास मान्यता दिली आहे.

सिंचनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध पिके घेता यावीत, यासाठी शासनाकडून १०० टक्के अर्थसाहाय्य शेतकऱ्यांना दिले जाते. यापूर्वी दोन लाख ९० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जात होते; परंतु, यावर्षीपासून एका विहिरीसाठी चार लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. शेतात सिंचनाची सोय करणे सुलभ झाले आहे. प्रत्येक गावात किमान १५ विहिरी खोदता येऊ शकतात.ग्रामसभेने शेतकऱ्यांचे अर्ज मंजूर केल्यानंतर एक ते दोन महिन्यांत सदर ठरावाला मंजुरी पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडून प्राप्त *** होते. त्यानंतर आराखडा तयार करून संबंधित शेतकऱ्याला विहीर खोदण्याचे आदेश दिले जातात.

**अर्ज कसा करणार?**

ग्रामसभा किंवा ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योजनेच्या लाभासाठी अर्ज करता येऊ शकतो; परंतु, अनेक शेतकरी ग्रामसभेत अर्ज सादर करता येतो.

**कोणाला मिळते अनुदान?**

ज्या शेतकऱ्याकडे एक एकर शेती आहे, त्या शेतकऱ्याला सिंचन विहीर मंजूर होऊ शकते. यापूर्वी दीड एकर शेतीची अट होती.

# हिंदी विद्यापीठात ठिय्या आंदोलन सुरू, विधी शाखेस मान्यता नसल्याचा वाद

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक वर्धा**

नाना कारणांनी येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ नेहमीच चर्चेत असते. वादाचे दुसरे नाव म्हणजे हिंदी विद्यापीठ, असे म्हटल्या जाते. सध्या विधी अभ्यासक्रमाचा वाद सुरू आहे. येथील एलएलबी अभ्यासक्रमाला बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता नसल्याने दीड महिना शिकविणे बंद होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतत दबाव आणला. अखेर विद्यापीठाने मान्यता मिळवून घेतली. मात्र नियमित वर्ग सुरू झालेले नाहीत. शैक्षणिक नुकसान होत असल्याने विद्यार्थ्यांनी कुलसचिवांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. या मागणीसोबतच पूर्वी ज्या विद्यार्थ्यांचे निलंबन केले ते रद्द करण्याची मागणी आहे. आंदोलनाबाबत अद्याप काहीही तोडगा न निघाल्याने आंदोलन सुरूच असल्याची माहिती मिळाली.

# शिक्षकेतर संघटनेचे राज्य अधिवेशन ७ जानेवारी रोजी

**दि२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**

शिक्षकेतर संघटनेच्या राज्य महामंडळाचे ५१ वे राज्यस्तरीय अधिवेशन व चर्चासत्र जिमखाना मैदान, सावंतवाडी येथे ७ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनाला शिक्षणमंत्री दीपक केसरकर, केंद्रीय मंत्री नारायण राणे उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनामध्ये शिक्षकेतरांच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा होणार आहे. त्यामध्ये २०१९ च्या नवीन आकृतीबंधानुसार शिक्षकेतरांची नवीन भरती सुरू करणे, आश्वासित प्रगतीयोजना म्हणजे १०-२०-३० लागू करणे, शिक्षकेतरांना पदोन्नतीची संधी देणे आदी प्रशांचा समावेश आहे. जिल्ह्यातील सर्व शिक्षकेतर बंधू-भगिनींनी या अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष संजय बुरघाटे, कार्याध्यक्ष विकास दिवे, कोषाध्यक्ष सागर वाघमारे, सचिव भाष्कर ढेवले, उपाध्यक्ष मनीष देशमुख, जितेंद्र टावरी, नुरुद्दीन अली, सहसचिव प्रवीण इंगोले, वर्षा डकरे, प्रगती बोचडे, राजेश भुते, दिनेश अतकर, देवानंद पाटील, सुनील भागवत, अनंत गावंडे, चंद्रजीत भुयार, संघपाल सरदार, अरुण मोहोड आदींनी केले आहे.

# जिजाऊ बँक निवडणूक; दीडशे कर्मचारी दिमतीला

## १९ केंद्रांवर प्रत्येकी तीन कर्मचारी राहणार तैनात : काउंटडाउन सुरू, आज प्रचार थांबणार

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिजाऊ कमर्शिअल को ऑपरेटिव्ह बँकेच्या ३१ डिसेंबर रोजी होऊ घातलेल्या निवडणुकीकरीता उपनिबंधक कार्यालय सज्ज झाले असून निश्चित करण्यात आलेल्या १९ मतदान केंद्रांवर सुमारे दिडशे कर्मचाऱ्यांच्या ड्युटी लावण्यात आली आहे. मतदानाचे काउंटडाउन सुरू झाले असून शुक्रवारी सायंकाळी ६ वाजतानंतर प्रचार थांचणार आहे.

जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीत ३५ उमेदवार रिंगणात आपले भाग्य आजमावत आहे. गुरूवारी या निवडणूक लढविणाऱ्या या ३५ उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून त्यांना चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे उमेदवारांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. प्रशासनाकडून देखील निवडणुकीची जोरात तयारी सुरू आहे. या निवडणुकीत ६ हजार ६७६ मतदार मतदान करणार असून मतदानाकरीता १९ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये अकोला, यवतमाळ, नागपूर या तीन जिल्ह्यासह अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, पुणे, मुंबई येथील देखील मतदारांकरीता शहरातील सायंसकोर व गर्ल्स हायस्कूल या दोन शाळांमध्ये १२ मतदान केंद्र देण्यात आले आहे. याशिवाय, मोर्शी, दर्यापूर, अचलपूर आणि चांदूरबाजार या चार तालुक्यात देखील मतदान केंद्र देण्यात आले आहे. या १९ मतदार केंद्रांवर सुमारे दिडशे कर्मचारी तैनात राहणार आहे. शुक्रवारी उमेदवारांचा खुला प्रचार थांबणार आहे. त्यानंतर मात्र शनिवारी छुप्या प्रचाराला सुरूवात होईल, या निवडणुकीत दोन पॅनल रिंगणात असल्याने कोणते पॅनल बाजी मारते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.